दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ✿ रविवार, दि. १९ जुलै २०२६ ✿ वर्ष : १ ✿ अंक : ८९ ✿ पाने : ४ ✿ किंमत : ४ रू. ✿ Email : hinduprakashvarta@gmail.com

## श्रीकृष्ण चरणी अर्पण केली 20 लाखांची सोन्याची बासरी

**राजस्थान :** राजस्थानात चित्तोडगड जिल्ह्यातील मेवाडचे प्रसिद्ध श्री सावळिया सेठ मंदिरात जयपूर येथील एका भाविक कुटुंबाने भगवान सावळिया सेठ या नावाने प्रसिद्ध असलेल्या भगवान श्रीकृष्णाला सुमारे १३७ ग्रॅम सोन्याची बासरी अर्पण केली आहे. सध्याच्या सोन्याच्या दरानुसार या बासरीची किंमत साधारण २० लाख रुपये असल्याचा अंदाज आहे. या भाविक कुटुंबाची मनोकामना पूर्ण झाल्यामुळे देवाबद्दल कृतज्ञता आणि अढळ श्रद्धा व्यक्त करण्यासाठी ही विशेष भेट अर्पण करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

## 'दुय्यम श्रेणीचा प्रवासी' शब्दावर आक्षेप, कुटुंबाला 8 लाखांची नुकसान भरपाई

**नवी दिल्ली :** रेल्वे अपघात प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने 'दुय्यम श्रेणीचा प्रवासी' या शब्दप्रयोगावर आक्षेप घेत पीडिताच्या कुटुंबाला ८ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. रेल्वे अपघातात मृत्यू झालेल्या प्रवाशाच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देताना, कायदेशीर कागदपत्रांमध्ये वापरण्यात आलेल्या 'दुय्यम श्रेणीचा प्रवासी' या शब्दप्रयोगावर तीव्र आक्षेप नोंदवला आहे. न्यायालयाने हा शब्दप्रयोग भारतीय संविधानाच्या भावनेशी विसंगत असल्याचे नमूद करत संबंधित कुटुंबाला ८ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे रेल्वेला आदेश दिले.

## ट्रम्प यांनी करार 'संपला'चे जाहीर करताच इराणने अमेरिकेसोबतचा शस्त्रसंधी सामंजस्य करार गोठवला

**मुंबई :** इराणने अमेरिकेसोबतच्या सामंजस्य कराराअंतर्गत (एमओयू) शस्त्रसंधीशी संबंधित सर्व वचनबद्धता स्थगित करत असल्याची घोषणा केली आहे, ज्यामुळे दोन्ही देशांमधील आधीच तणावपूर्ण असलेल्या संबंधांमध्ये नवीन तणाव निर्माण झाला आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वॉशिंग्टन आता हा करार वैध मानत नसल्याचे संकेत दिल्यानंतर काही दिवसांतच हे पाऊल उचलण्यात आले आहे. नाटो शिखर परिषदेपूर्वी नाटोचे महासचिव मार्क रुटे यांच्यासोबत बोलताना ट्रम्प म्हणाले, "माझ्या मते, हे प्रकरण आता संपले आहे. मला त्यांच्याशी कोणताही व्यवहार करायचा नाही."

त्यांनी इराणच्या नेतृत्वावरही जोरदार हल्ला चढवत म्हटले, "ते नीच आहेत. ते विकृत लोक आहेत. त्यांचे नेतृत्व विकृत लोक करत आहेत. माझ्या मते, त्यांच्याशी संबंध ठेवणे म्हणजे केवळ वेळेचा अपव्यय आहे."

युद्धविराम सामंजस्य करार काय होता?

अनेक आठवड्यांच्या अप्रत्यक्ष वाटाघाटींनंतर गेल्या महिन्यात स्वाक्षरी झालेल्या सामंजस्य कराराचा उद्देश वॉशिंग्टन आणि तेहरान यांच्यातील तणाव कमी करणे हा होता.



या करारद्वारे युद्धविराम स्थापित करणे, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून व्यापारी जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीची खात्री करणे, तसेच निर्बंधांमधील सवलत आणि इराणच्या अणुकार्यक्रमावर भविष्यातील चर्चेसाठी पायाभरणी करणे, हे उद्दिष्ट होते.

मात्र, दोन्ही बाजूंनी एकमेकांवर आपापली वचनबद्धता न पाळल्याचा आरोप केल्यामुळे, हा करार लवकरच विस्कळीत होऊ लागला.

अमेरिका आणि इराण यांनी एकमेकांवर कराराचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे.

व्हाइट हाऊसने इराणवर होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये व्यापारी जहाजांना लक्ष्य करून आणि प्रदेशात अस्थिरता निर्माण करून सामंजस्य कराराचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे.

दुसरीकडे, तेहरानचा दावा आहे की वॉशिंग्टनने लष्करी कारवाया पुन्हा सुरू करून आणि करारातील प्रमुख तरतुदींची अंमलबजावणी न करून सामंजस्याचे उल्लंघन केले आहे.

### लष्करी तणाव वाढतच आहे

वेगाने वाढणाऱ्या लष्करी तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणने आपली वचनबद्धता स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

अमेरिकेने इराणच्या लक्ष्यांवर सलग सातव्या रात्री हल्ले केले असून, प्रत्युत्तरादाखल तेहरानने 'मोठ्या प्रमाणावर आक्रमण' करण्याचा इशारा दिला आहे.

ताज्या घडामोडींमुळे जगातील सर्वात महत्त्वाच्या तेल वाहतूक मार्गांपैकी एक असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या सुरक्षेबाबत चिंता पुन्हा वाढली आहे आणि या संघर्षाचे रूपांतर एका व्यापक प्रादेशिक संघर्षात होण्याची भीती निर्माण झाली आहे.

## थोडक्यात वार्ता

### कोरोनाची पुन्हा चाहूल? महाराष्ट्रात 48 रुग्णांची नोंद

**मुंबई :** कोरोना महामारीच्या आठवणी अजून ताज्या असतानाच पुन्हा एकदा कोविड-१९च्या रुग्णसंख्येबाबत चिंता वाढवणारी माहिती समोर आली आहे. आंध्र प्रदेशानंतर आता महाराष्ट्रातही कोरोनाचे रुग्ण आढळल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, आरोग्य विभागाने यासंदर्भात महत्त्वाचा खुलासा करत नागरिकांना घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे. आंध्र प्रदेशात २६ जून ते १६ जुलैदरम्यान कोविड-१९चे १२ रुग्ण आढळले होते. त्यापैकी चार जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर १ जुलै ते १६ जुलैदरम्यान आणखी ११ जणांना कोरोनाची लागण झाल्याची नोंद झाली. मृत्यू झालेल्या चारही रुग्णांना आधीपासून गंभीर सहव्याधी (Co-morbidities) होत्या, अशी माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली आहे.

### उबाठाच्या 6 खासदारांच्या शिंदे सेनेत विलीनीकरणास मंजुरी

**मुंबई :** लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांनी शनिवारी, १८ जुलै रोजी, शिवसेना (यूबीटी) च्या सहा खासदारांना महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत विलीन होण्यास मंजुरी दिली. याव्यतिरिक्त, अध्यक्षांनी तृणमूल काँग्रेसमधून फुटून नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया (एनसीपीआय) मध्ये सामील झालेल्या २० खासदारांना लोकसभेत स्वतंत्र जागा देण्यासही मंजुरी दिली.तृणमूल काँग्रेस आणि शिवसेना (यूबीटी) यांना पक्षांतराच्या लाटेचा फटका बसला आहे. टीएमसीच्या तिकिटावर निवडून आलेल्या एकूण २९ लोकसभा खासदारांपैकी तब्बल २० खासदारांनी पक्ष सोडून फारशा परिचित नसलेल्या नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया (एनसीपीआय) मध्ये प्रवेश केला आहे. त्यांनी संसदेत स्वतंत्र आसनव्यवस्थेची मागणी केली होती आणि सत्ताधारी एनडीएमध्ये सामील होण्याची इच्छा व्यक्त केली होती.

### पुणे-संभाजीनगर प्रवास दोन तासांत; मुंबई-बेंगळुरू अंतर पाच तासांत

**पुणे :** पुणे ते संभाजीनगर प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी नवीन उन्नत मार्ग उभारण्यात येणार असून, या प्रकल्पामुळे हे अंतर अवघ्या दोन तासांत पार करता येणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. पुण्यात विविध रस्ते व पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या उद्घाटनप्रसंगी गडकरी बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून सुमारे ५० हजार कोटी रुपयांच्या कामांना लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुणे-संभाजीनगर मार्गावरील प्रस्तावित प्रकल्पामुळे पुण्याच्या वाढत्या वाहतूक समस्येवर उपाय मिळणार आहे. शिरूर ते संभाजीनगर या सुमारे १५ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पामुळे पुणे-संभाजीनगर प्रवास दोन तासांत शक्य होईल. पुढे संभाजीनगर ते नागपूर प्रवास सुमारे पाच तासांत पूर्ण करता येणार आहे. हा मार्ग पुणे आणि नागपूरला जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गासाठी सुमारे १,२५० कोटी रुपयांचे काम सुरू असून, या मार्गाचे सुशोभीकरण ऐतिहासिक स्वरूपात करण्यात येणार असल्याचे गडकरी यांनी सांगितले. दिल्ली-चेन्नई महामार्गावरील महाराष्ट्रातील भागात सुमारे ३२० किलोमीटर अंतर कमी होणार आहे. तसेच पुणे-मुंबई जुन्या महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी नवीन उपाययोजना राबवण्यात येणार आहेत.

## अहमदाबादमधील फटाक्यांच्या कारखान्याला आग : 9 जणांचा मृत्यू



**अहमदाबाद :** अहमदाबादच्या वस्त्राल भागातील फटाक्यांच्या कारखान्यात मोठी आग लागल्याने व्यापक आपत्कालीन प्रतिसाद तैनात करण्यात आला. शुक्रवारी अहमदाबादच्या वस्त्राल भागातील एका फटाक्यांच्या कारखान्यात भीषण आग लागली, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर आपत्कालीन प्रतिसाद सुरू झाला. अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या आणि अग्निशमन दलाने आग नियंत्रणात आणण्यासाठी मोहीम सुरू केली.

रामोल-गटराड रस्त्यावर असलेल्या टॅलेंट फटाका कारखान्यात आग लागली. प्राथमिक अहवालानुसार, किमान नऊ जणांचा मृत्यू झाला असून, सुमारे ५-६ जण जखमी झाले आहेत. तथापि, जखमींची नेमकी संख्या आणि आगीचे कारण अद्याप अधिकृतपणे निश्चित झालेले नाही.

ही घटना अहमदाबादच्या पूर्व भागात, रामोल पोलीस ठाण्याच्या हद्दीत, रामोल-गटराड रस्त्यावरील आरएएफ कॅम्पच्या मागील परिसरात घडली. मेहुल डोडिया नावाचा एक व्यक्ती कालव्याजवळील मोकळ्या मैदानात बेकायदेशीरपणे फटाक्यांचा कारखाना चालवत होता. त्याचा परवाना आधीच रद्द करण्यात आला होता, तरीही त्याचा हा व्यवसाय सुरूच होता.

सर्व जखमींना उपचारासाठी तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. स्थानिक पोलीस, अहमदाबाद महानगरपालिका अग्निशमन दलाचे पथक आणि आरएएफ कॅम्पमधील जवानांनी घटनास्थळी धाव घेतली आणि आगीवर नियंत्रण मिळवले.

रामोल पोलीस सदोष मनुष्यवधाचा गुन्हा, तसेच स्फोटक कायद्याच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करून पुढील कायदेशीर कारवाई करतील. न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा (FSL) आणि इतर संबंधित यंत्रणांनाही तपासासाठी घटनास्थळी बोलावण्यात आले आहे, अशी माहिती अहमदाबादचे सहपोलीस आयुक्त जयपाल सिंग यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आहे. पंतप्रधान कार्यालयाने एका पोस्टमध्ये लिहिले आहे, "गुजरातच्या अहमदाबाद येथील फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या दुर्घटनेत जीवितहानी झाल्याचे ऐकून अत्यंत दुःख झाले. या दुःखद प्रसंगी माझे विचार शोकाकुल कुटुंबांसोबत आहेत. जखमींच्या शीघ्र आरोग्यासाठी प्रार्थना. स्थानिक प्रशासन पीडितांना सर्वतोपरी मदत करत आहे. प्रत्येक मृताच्या कुटुंबीयांना पीएमएनआरएफमधून २ लाख रुपयांची सानुग्रह मदत दिली जाईल. जखमींना ५०,००० रुपये दिले जातील. -

घटनास्थळी विशेष अग्निशमन वाहनांसह पाचपेक्षा जास्त अग्निशमन गाड्या, तसेच वरिष्ठ अग्निशमन अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. सध्या बचाव आणि आग विझवण्याचे कार्य सुरू आहे. अधिक तपशील अपेक्षित आहे.

## नाशिकच्या माजी महापौराला 200 तोळ्यांचा गंडा, गुन्हा दाखल

**नाशिक :** नाशिकमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. 'सोने दुप्पट करून देतो' या आमिषाला बळी पडल्यामुळे नाशिकचे माजी महापौर अशोक मुर्तडक यांच्या कुटुंबाची तब्बल २०० तोळे सोन्याच्या दागिन्यांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी माजी महापौर अशोक मुर्तडक यांनी पंचवटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार दोन वर्षांपूर्वी माजी महापौर अशोक मुर्तडक यांची संशयित योगेश बाळकृष्ण दाभाडे (रा. नाशिक) याच्याशी ओळख झाली. त्याने घरातील महिलांचा विश्वास संपादन केला आणि महिलांना 'सोने दुप्पट करून देतो' असे आमिष दाखविले. मुर्तडक यांच्या आई दुर्गाबाई मुर्तडक आणि मावशी विठाबाई धात्रक यांनी त्यांच्या निधनापूर्वी स्त्रीधनातील जुने दागिने कुटुंबातील महिलांना वाटून दिले होते. त्यामध्ये पत्नी आशा मुर्तडक यांना १०० तोळे, मुलगी रोशनी हिला ५० तोळे आणि सून पूजा मुर्तडक यांना ५० तोळे, असे एकूण २०० तोळे सोन्याचे दागिने मिळाले होते. हे सर्व सोने दुप्पट करुन देण्याचे आमिष दाखवून दाभाडे याने १ जानेवारी २०२५ पूर्वी घरातील महिलांकडून सोनं ताब्यात घेतलं.

मात्र आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलांनी हा विषय अशोक मुर्तडक यांना सांगितला. त्यानंतर मुर्तडक यांनी संशयिताला घरी बोलावून किमान मूळ दागिने परत करण्याची विनंती केली. त्यावेळी दाभाडे याने दागिने परत करण्याची ग्वाही दिली. मात्र दीड वर्ष उलटूनही दागिने अद्याप परत केले नाही. अखेर फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर मुर्तडक यांनी पोलिसांकडे धाव घेतली. पंचवटी पोलिसांनी संशयित योगेश दाभाडे याच्याविरुद्ध अपहार आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक सचिन चव्हाण या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

**एप्रिलमध्ये दाभाडेकडून मुतर्डकांवर गुन्हा :** चालू वर्षात म्हणजेच एप्रिल २०२६ मध्ये संशयित योगेश दाभाडे याने अशोक मुर्तडक यांच्याविरुद्ध पंचवटी पोलिसांत फिर्याद दिली होती. त्यात, मुर्तडक यांनी वर्षभरापूर्वी ९० लाख रुपये हातउसनवार घेतल्याचे नमूद केले होते. काही रकमेची परतफेड केल्यानंतर उर्वरित पैशांसाठी मुर्तडक यांनी गेल्या सहा महिन्यांपासून सतत मानसिक त्रास दिला. या कथित छळाला कंटाळून दाभाडेने आत्महत्येचा प्रयत्न केला होता. यानंतर, मुर्तडकांवर गुन्हा नोंदवण्यात आला होता. पंचवटी पोलिस सध्या या दोन्ही परस्परविरोधी प्रकरणांचा आणि कोट्यवधींच्या सोन्याच्या अपहाराचा सखोल तपास करत आहेत.

## अकरा लाखाची म्हैस ठरली आकर्षणाचा केंद्रबिंदू; साडेपाच लाखापर्यंत लागली बोली

### म्हशीला पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांची गर्दी

हिंदू प्रकाश वार्ता /अशोक पवार

**परभणी:** बाजारात दर्जेदार दुबत्या जनावराची फार मोठी मागणी आहे दुग्ध व्यवसायाला चांगले दिवस आले असून अशाच परिस्थितीमध्ये परभणी येथील खंडोबा बाजार येथे येथील एका व्यापाऱ्याने गुजरातयेथून आणलेले एक म्हैस सध्या परभणीकरांचे आकर्षणाचा बिंदू बनला आहे खरेदीच्या बोलीमध्ये या म्हशीची किंमत तब्बल अकरा लाख रुपये सांगण्यात येत असून गुरुवार दिनांक 16 जुलै रोजी साडेपाच लाखापर्यंत ची बोली देखील लावण्यात आली होती या म्हशीला खरेदी करून आणणारा म्हशीचा व्यापारी शेख शोएब यांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार या म्हशीचे वर्णन अशा प्रकारे आहे



की ही म्हैस दिसायला अत्यंत धिप्पाड आणि उंची पुरी असून या म्हशीची उंची सात फुटांपेक्षा जास्त असून तिची लांबी ही विलक्षणीय आहे हिमेश एका दिवसाला तब्बल 30 लिटर दूध ( एका वेळेस 15 लिटर दूध व दोन टायमाला 30 लिटर दूध देण्याची तिची क्षमता आहे भव्य दिव्य आहे की तिला वाहतुकीसाठी स्वातंत्रपणे एका वाहनाची पूर्णपणे जागा लागते व तिची वाहतूक करण्यास अडचणीचा सामना करावा लागतो काळजीपूर्वक अशा प्रकारे वाहतूक करावे लागते . सध्या दुग्ध व्यवसाय वाढती स्पर्धा आणि शासनाने बनवत दुधाच्या विरोधात उचललेले कठोर पाऊल यामुळे बाजारात असल दुभत्या जनावरांचा भाव चांगलाच उधारला आहे सध्या बाजारामध्ये दुधाला प्रति लिटर 120 रुपयापर्यंत दर उपलब्ध आहे उच्च प्रतीच्या म्हशीला खरेदी करण्याकडे वाढला आहे

ह्या भीमकाय म्हशीला

-> पान 2 वर



*अखिल भारतीय दहशत विरोधी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मनिंदरजीतसिंग बिट्टा यांनी आज शनिवारी पहाटे वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिरास भेट देवुन भगवान शंकराचे भाविक

## "शाल जोडे"




## समाजकंटकांकडून एक एकर उभी कारल्याची बाग उद्ध्वस्त ! शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान

**नाशिक :** नाशिकच्या येवला तालुक्यातील धुळगाव येथे संतापजनक प्रकार समोर आला आहे. धुळगाव येथील एका कष्टकरी शेतकऱ्याच्या हाता-तोंडाशी आलेला घास अज्ञात समाजकंटकांनी हिरावून घेतल्याचा धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. येथील शेतकरी संजय बाळासाहेब वाळके यांच्या गट नंबर ३८२ मधील एक एकर क्षेत्रावरील उभ्या कारल्याच्या पिकाची अज्ञात विकृत प्रवृत्तीच्या लोकांनी अक्षरशः राखरांगोळ केली आहे. या क्रूर कृत्यामुळे परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.



शेतकरी संजय वाळके यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदा कांद्याला योग्य भाव मिळत नसल्यामुळे त्यांनी पर्यायी पीक म्हणून कारल्याची लागवड करण्याचा निर्णय घेतला होता. यासाठी त्यांच्याकडे पैसे नव्हते त्यामुळे त्यांनी कर्ज काढून अत्यंत मेहनतीने एक एकरात ही बाग उभी केली. पीकही अतिशय जोमदार आले होते आणि कारल्याची तोडणी सुरू झाली होती. बाजारपेठेत कारल्याला ६०० ते ७०० रुपये प्रति कॅरेट असा चांगला दर मिळत असल्याने वाळके कुटुंबाला मोठ्या आर्थिक आधाराची आशा होती. मात्र, गुरुवारी रात्रीच्या सुमारास अज्ञात समाजकंटकांनी शेतात घुसून धुडगूस घातला. एका एकरात असलेल्या एकूण १५ लाईन्सपैकी तब्बल ९ लाईन्सवरील कारल्याचे वेल मुळासकट उपटून फेकून दिले. प्रत्येकी ३५० फूट लांबीच्या या ९ लाईन्स पूर्णपणे नष्ट करण्यात आल्या आहेत. यामुळे वेल वाळून गेले असून चालू पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे. या नुकसानीमुळे वाळके यांचे अंदाजे १५ ते १६ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

या दुर्दैवी घटनेनंतर शेतकरी संजय वाळके यांनी येवला तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात रीतसर तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी गुन्हा नोंदवून घेतला आहे. पोलीस सध्या या विकृत कृत्य करणाऱ्या आरोपींचा शोध घेत आहेत.

**शासनाने तात्काळ मदत करावी - पीडित शेतकरी :** आधीच कर्जबाजारी असताना कांद्याला भाव नाही म्हणून मोठ्या आशेने कारल्याचे पर्यायी पीक घेतले होते. पीक चांगले आल्यावर कोणीतरी आकसापोटी रात्रीतून माझी उभी बाग उद्ध्वस्त केली. शासनाने आणि प्रशासनाने मला या संकटातून बाहेर काढण्यासाठी तात्काळ आर्थिक सहकार्य करावे आणि माझ्या पिकाचे वाटोळे करणाऱ्यांना कठोर शिक्षा करावी." अशी मागणी पीडित शेतकरी संजय बाळासाहेब वाळके यांनी केली आहे.

# सं पा द की य

## संसदीय लोकशाहीतील विरोधकांचे स्थान आणि बहुमताच्या सत्ते मर्यादा

संसदेचे आगामी अधिवेशन सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर, भारतीय लोकशाहीच्या भवितव्याविषयी जागृत नागरिकांच्या मनात निर्माण होणारा प्रश्न अत्यंत पायाभूत आणि घटनात्मक महत्त्वाचा आहे. संसद हे खरोखरच विचारविनिमय, तर्कशुद्ध चर्चा आणि कार्यकारी मंडळाला उत्तरदायी बनवणारे सर्वोच्च व्यासपीठ म्हणून काम करणार, की ती केवळ संख्याबळाच्या जोरावर सत्ता गाजवण्याचे आणि बहुमताची मंजुरी मिळवण्याचे एक औपचारिक केंद्र बनणार, ही चिंता समकालीन भारताच्या राजकीय संस्कृतीला पडलेले एक मोठे कोडे आहे. भूतकाळातील हिवाळी अधिवेशनादरम्यान ज्या अभूतपूर्व पद्धतीने बहुतांश विरोधी खासदारांना निलंबित करून, विरोधकांच्या आवाजाशिवाय महत्त्वाची विधेयके घाईघाईने मंजूर करण्यात आली, तो संसदीय लोकशाहीच्या मूळ तत्त्वज्ञानाला बसलेला एक मोठा धक्का होता. जेव्हा लोकशाहीतील विरोधी आवाज पद्धतशीरपणे कमकुवत केला जातो किंवा त्याला अनावश्यक मानले जाते, तेव्हा ती लोकशाही खऱ्या अर्थाने लोकशाही उरत नाही. संसदेची कल्पना केवळ संख्याबळाच्या आधारे कायदे लादणारी संस्था म्हणून कधीच केली गेली नव्हती. आपल्या संविधानानुसार, संसद हे असे सभागृह आहे जिथे परस्परविरोधी दृष्टिकोनांचे मंथन होते, जिथे सरकारच्या प्रत्येक निर्णयाची कसून छाननी केली जाते आणि जिथे मतभेदांना अडथळा न मानता सुशासनाची एक अपरिहार्य अट मानले जाते. शंभर वर्षांपूर्वी ब्रिटनच्या संसदेत बेंजामिन डिझरायली यांनी दिलेला इशारा आजही तितकाच जिवंत आहे की, "प्रबळ विरोधी पक्षाशिवाय कोणतेही सरकार सुरक्षित राहू शकत नाही आणि विरोधकांशिवाय संसदीय प्रणाली म्हणजे ब्रेक नसलेले यंत्र आहे." विरोधी पक्ष ही लोकशाहीतील गैरसोय नसून, ती लोकशाहीच्या जिवंतपणाची पहिली अट आहे. दुर्दैवाने, आजच्या सार्वजनिक आणि संसदीय चर्चेत सरकारला असणारा विरोध आणि राष्ट्राला असणारा विरोध यांमधील सीमारेषा पुसट करण्याचा धोकादायक प्रयत्न केला जात आहे. सरकारे ही तात्पुरती असतात आणि निवडणुकांच्या माध्यमातून सत्तेवर येतात, परंतु प्रजासत्ताक हे कायमस्वरूपी असते आणि त्याला संविधानातून वैधता मिळते, या मूलभूत सत्याचा विसर पडू देणे देशाला परवडणारे नाही. संसदेच्या प्रत्येक सदस्याला, मग तो सत्ताधारी बाकावरील असो वा विरोधक, जनतेचा समान लोकशाही कौल मिळालेला असतो. त्यामुळे विरोधी पक्षाला अवैध ठरवणे म्हणजे केवळ एका पक्षाला कमकुवत करणे नसून, त्या पक्षाला मतदान करणाऱ्या देशातील लाखो नागरिकांचा आवाज दाबण्यासारखे आहे. बहुमत निर्णय घेण्याचा अधिकार नक्कीच प्रदान करते, परंतु ते देशभक्तीवर मक्तेदारी करण्याचा अधिकार देत नाही. डॉ. बी. आर. आंबेडकर आणि जवाहरलाल नेहरू यांनीही लोकशाहीत अनियंत्रित सत्ता एकवटण्याच्या धोक्यांबद्दल आणि "टीकेच्या खेळाच्या" महत्त्वावर नेहमीच भर दिला होता. राजकीय परिस्थिती ही नेहमीच बदलत असते; आज जे सत्तेत आहेत ते उद्या विरोधी बाकांवर असू शकतात, याचा इतिहास साक्षी आहे. त्यामुळे, लोकशाहीचे खरे मूल्यमापन सरकार किती सहजतेने राज्यकारभार करते यावरून होत नाही, तर ते किती आत्मविश्वासाने आणि सन्मानाने मतभेदांना सामावून घेते यावरून होते. भारताच्या लोकशाहीची खरी ताकद विरोधी पक्षाचा आवाज दाबण्यात नसून, सत्तेला प्रश्न विचारण्याचे त्यांचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यातच आहे.

## शेतकऱ्यांची साडेपाच कोटीची फसवणूक करून फसवणूक करून व्यापारी फरार

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** पूर्णा तालुक्यातील झिरो फाटा परिसरातील जय जवान जय किसान ट्रेडिंग कंपनीच्या माध्यमातून तब्बल पाच कोटी 56 लाख 49 हजार 300 रुपयांच्या कृषी माला च्या व्यवहारातून शेतकऱ्याची मोठी फसवणूक धक्कादाक माहिती समोर आली

या प्रकरणात पूर्णा पोलीस ठाण्यात दोन व्यक्तींवर पूर्णा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता च्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून ही घटना घडल्याने तालुक्यातील व परिसरातील शेतकरी बांधवांमध्ये फार मोठी खळबळ उडाली आहे.

अधिक माहितीनुसार रामप्रसाद साहेबराव काळे वय 56 वर्ष राहणार एरंडेश्वर तालुका पूर्णा यांनी दिलेल्या तक्रारीवरून शेख हमीद उर्फ अमित शेख सरूव शेख सरु शेख बाले साब राहणार एरंडेश्वर तालुका पुर्णा यांच्या विरोधात पूर्णा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे रामप्रसाद साहेबराव काळे यांनी दिले तक्रारीनुसार आरोपींना दिनांक 1 ऑक्टोबर 2023 ते 30 मे 2026 या कालावधीत फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांच्या मालकीच्या एक हजार 96 कुंटल हळद 3360 क्विंटल सोयाबीन आणि 39 क्विंटल तूर असा एकूण असा एकूण पाच कोटी छप्पन लाख 49 हजार 300 रुपयाचा कृषी माल खरेदी करून या मालाची रक्कम देण्याचा आश्वासन देऊन वारंवार टाळाटाळ केली मोक्याचा फायदा घेऊन अखेर गाव व घर सोडून तसेच मोबाईल बंद करून आरोपी फरार झाल्याचे निदर्शनास आले यामुळे आपली आर्थिक फसवणूक झाल्याचे रामप्रसाद काळे यांच्या लक्षात आल्यानंतर पूर्णा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पाटील करीत असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे कोट्यावधीच्या कथित फसवणुकीमुळे परिसरातील शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून उधारीवर कृषीमाल विक्री करताना सतर्क राहणे गरजेचे आहे.

## अकरा लाखाची म्हैस ठरली आकर्षणाचा केंद्रबिंदू; साडेपाच लाखापर्यंत लागली बोली

पान 1 वरून ->

पाहण्यासाठी परभणीकराने तोबा गर्दी केली बाहेर जिल्ह्यातील या म्हशीला पाहण्यासाठी व इच्छुक असणाऱ्यांनी त्या म्हशीला खरेदी करण्यासाठी गर्दी केली होती बोलीमध्ये या म्हशीची किंमत अकरा लाख रुपये लागली असून किमान सात लाख रुपयांपर्यंत या म्हशीची विक्री करण्यात येणार असल्याची माहिती म्हैस व्यापारी शेख शोएब यांनी दिली.

# तरुणांची वाढती गुन्हेगारी; कारण मिमांसा चिकित्सा...

"जास्त बोलू नका, मी एका ठोक्यात पाडीन बरं तुम्हालं", एक सोळा वर्षाचा किशोर वयीन कार्ट आपल्या बापाला बोलत होत. समजून सांगणारा जेंव्हा त्यांच्या मधात गेला तेंव्हा, तो पोरगा म्हणतो "मंग सांगा न त्याह्यल मल गाडी घेऊन द्या म्हणून". त्यावेळी गाडी मिळाली नाही तो पोरगा घरून रूसून गेला, मध्यंतरी तो एकच महिन्यात दुचाकी घेऊन आला, माय बापाने कौतुक केलं, ती गाडी कुठून, कशी, काय आणली चौकशी केली नाही आणि तिथून पुढे एकच महिन्यात मोठ्या गुन्ह्यात अडकून थेट पोलिसांच्या ताब्यात गेला. ही सत्य घटना आहे. पण अशा हजारो लाखो सत्य घटना आता खेड्यात आणि शहरात बाल, किशोर आणि तरुणांमध्ये होत आहेत. एकत्र कुटुंब उद्ध्वस्त झाल्याने माय बाप त्याच्यात व्यस्त आहेत, प्रशासन सुस्त आहे, आणि समाज जागरूक राहिला नाही. पण हे असंच चालू राहिलं तर राष्ट्र म्हणून, तरुण म्हणून हा चिंतेचा विषय आहे हे खरं...

अलिकडच्या वर्षांत अल्पवयीन मुलांमधील आणि तरुणांच्या मधील गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये वाढ होत आहे. ही परिस्थिती सामाजिक नियम, कायदेशीर चौकट आणि समाजाच्या एकूण सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे आव्हान उभी करत आहे. या प्रवृत्तीमागे सामाजिक-आर्थिक विषमता, हिंसाचार आणि माध्यमांचा प्रभाव असे विविध घटक कारणीभूत आहेत. चोरी आणि अंमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांपासून ते हिंसक कृत्यांपर्यंत अल्पवयीन मुले आणि तरुण गंभीर गुन्ह्यांमध्ये गुंतत आहेत. त्यामुळे या समस्येची कारणे समजून घेणे आणि प्रतिबंधात्मक उपाय अंमलात आणणे अत्यावश्यक झाले आहे. गुन्हेगारी रोखण्यासाठी शिक्षण, समुदाय सहभाग आणि किशोर न्याय धोरणांमध्ये सुधारणा या बहुआयामी उपायांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. गुन्हेगारीतील वाढ केवळ तरुणांच्या कल्याणाला धोका पोहोचवत नाही, तर संपूर्ण समाजाच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करते. एनसीआरबीच्या ताज्या आकडेवारीनुसार, भारतातील गुन्हेगारीच्या आकडेवारीत महाराष्ट्र सातत्याने उच्च स्थानावर आहे. अल्पवयीन मुलं आणि किशोर व तरुणां कडून मोठ्या प्रमाणात गुन्हे घडत असून त्यामध्ये खून, खुनाचा प्रयत्न, चोरी आणि दरोडा यांसारख्या गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे. ह्यात अनेक घटक कारणीभूत आहेत दारिद्र्य अनेक अल्पवयीन मुले कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातून येतात, त्यामुळे हताश होऊन गुन्हेगारीकडे वळतात. त्यातच दर्जेदार शिक्षणाच्या मर्यादित संधीमुळे काही मुले बेकायदेशीर मार्गांचा अवलंब करतात. आणि सध्या अकार्यक्षम कुटुंब व्यवस्था झालेली आहे एकत्र कुटुंब जवळ जवळ मोडकळीस आलेल्या घरांतील किंवा दुर्लक्षित मुलांमध्ये गुन्हेगारीकडे झुकण्याची शक्यता जास्त दिसत असते. हा चिंतनाचा विषय आहे. सख्या भावाचे आपल्या पुतण्यावर लक्ष नाही. "बघेल त्याचा तो" ही मानसिकता आलेली आहे त्याचे मोठे कारण आहे ते आपली एकत्र कुटुंब पद्धती शून्य झाली आहे. पालक स्वतः गुन्हेगारीमध्ये असतील किंवा मुलांकडे दुर्लक्ष करत असतील, तर अशा वर्तनाला मुलांमध्ये चालना मिळते इथपर्यंत ठीक आहे. पण पालक एकटेच करणारे असतात, योग्य वयात मुलांकडे लक्ष नसत, त्यांना काय हवं नको ते योग्य वेळी न मिळाल्याने त्यांना ते जिथं उपलब्ध होईल ते बघतात मग तेथे गुन्हा जरी असला तरी मुलांना त्याची पर्वा नसते. ह्यात असही अनुभव बऱ्याच वेळा येतो. समवयस्क मित्रगटातील स्वीकार मिळवण्यासाठी काही मुले गुन्हेगारीकडे वळतात. आपणही तुमच्या सारखेच दबंग आहोत हे दाखवण्यासाठी देखील ह्यातून गुन्हा घडतो. त्यातच टेलिव्हिजन, चित्रपट आणि ऑनलाइन माध्यमांवर गुन्हेगारीचे प्रभावी चित्रण हे अल्पवयीन मुलांमध्ये जास्त, आणि तरुणांकडेही गुन्हेगारी प्रवृत्ती वाढवू शकते. ह्यातून गरीब आणि कमी शिक्षित मुलंच गुन्हेगारी कडे वळतात असं नाही तर उच्च शिक्षित मुलं हॅकिंग, ऑनलाइन फसवणूक ह्यात मोठ्या प्रमाणात आढळतात. शाळा किंवा समाजातील प्रतिकूल वातावरणामुळे टोळी संस्कृती वाढीस लागते. त्यातच सातत्याने येणारे शिक्षणात अपयश आल्याने आत्मसन्मान कमी होतो आणि काही मुले गुन्हेगारी मार्ग निवडतात. असेही प्रकरण वारंवार दिसत आहेत. बेरोजगार आणि कमी वेळात जास्त पैसा मिळवण्याचं साधन राजकारण झालं आहे. आपला एखादा तरुणांचा शे पन्नासचा गट तयार केला की मागाल तेवढा मोबदला ही राजकीय मंडळी द्यायला तयार असते. त्याच काम झालं की ती मंडळी ह्यांना विचार नाही, आणि मग सवयीचे गुलाम परत गुन्ह्याकडे वळतात...

युवकांच्या गुन्हेगारीच्या वाढत्या प्रमाणामुळे न्यायव्यवस्था आणि समाज चिंतेत आहे. सध्याचे कायदे कठोर करण्याची आवश्यकता असून, गुन्हेगार वयाने अल्पवयीन असला तरी त्याला योग्य शिक्षेची तरतूद असावी, असे मत तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. कायद्याच्या म्हणावं तसा वचका राहिलेला दिसत नाही. त्यासाठी कायद्यात काही बदल करून कठोर करून गुन्हेगारीला अळा घालण्यासाठी प्रयत्न सरकारी आणि कायद्याच्या स्तरावर देखील आवश्यक आहेत. त्यातच "बऱ्याच वेळा एक चूक माफ करा", असा समाजाचा आग्रह असल्याने देखील ही वृत्ती बळावत आहे असंही दिसतं आहे. चित्रपट, वेब सिरीज आणि सोशल मीडियाचा मुलांच्या मानसिकतेवर मोठा प्रभाव होत आहे. त्यामुळे ओटीटी प्लॅटफॉर्मवरील सामग्रीवर नियंत्रण आवश्यक आहे. याशिवाय, न्यायव्यवस्थेने गुन्हेगारांबाबत कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सातत्याने समाजातील जागरूक नागरिक करीत असतात. गुन्हेगार हा गुन्हेगार असतो, मग तो कोणत्याही वयाचा असो. अनेक गुन्हेगार अल्पवयीन असल्याने त्यांना किरकोळ शिक्षा होते, मात्र ते पुन्हा गुन्हेगारीत सामील होतात. न्यायव्यवस्थेने या प्रकरणांवर गांभीर्याने विचार करावा आणि कठोर कायद्यांची अंमलबजावणी करावी. गुन्हेगारी फक्त बोलून किंवा भाषण करून त्यावर मोठाले लेख लिहून कमी होणार नाही. गुन्हेगारी रोखण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देणे आवश्यक आहे. कुटुंब, शाळा, पोलीस प्रशासन आणि समाज यांची जबाबदारी तितकीच महत्त्वाची आहे. पोलिस विभागातील एका मोठ्या अधिकाऱ्याचे मत आहे “लहान मुलांमध्ये सोशल मीडियाच्या अतिरेकी वापरामुळे अजाणतेपणी गुन्हे करण्याचे प्रमाण वाढत आहे. पालकांनी मुलांच्या सोशल मीडिया वापरावर लक्ष ठेवले पाहिजे. तसेच, पोलिसांकडून शक्ती कक्षाच्या माध्यमातून शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना गुन्हेगारीविषयी जागरूक करण्याचे कार्य सुरू करणे गरजेचे आहे. तसेच महाविद्यालयातील मोठ्या गटांना भेटून त्याचे समुपदेशन करून त्यांना योग्य मार्गदर्शन आणि करिअरच्या संधी उपलब्ध आहेत असं दाखवणं आणि तशा संधी निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर आणि राज्य पातळीवर उपाययोजना करणं गरजेचं आहे. “गुन्हेगारी रोखणे ही केवळ शासन आणि पोलिसांची जबाबदारी नाही, तर पालकांनीही ती स्वीकारली पाहिजे. मुलांचे वर्तन, त्यांचे शारीरिक बदल, मोबाईलचा अतिरिक्त वापर, अभ्यासातील प्रगती, मित्रपरिवार याची माहिती पालकांकडे असली पाहिजे. योग्य वेळी समुपदेशन केल्यास बालगुन्हेगारी टाळता येऊ शकते.” हे ही लक्षात घेणं अत्यंत गरजेचं आहे. गुन्हेगारी ही केवळ कायद्याची किंवा प्रशासनाची समस्या नाही, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. पालकांनी मुलांशी संवाद साधावा, शाळांनी त्यांचे योग्य मार्गदर्शन करावे आणि प्रशासनाने कठोर कायद्यांची अंमलबजावणी करावी. गुन्हेगारी न्याय कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक पोलिस स्टेशनला एक अधिकारी असतो. त्यांच्यामार्फत अशा मुलांच्या सविस्तर याद्या तयार केल्या जाव्यात. त्या गुन्हेगार मुलांच्या घरी नियमित भेटी देणे, त्यांना अभ्यासासाठी प्रेरित करणे, त्यांच्यासाठी क्रिकेट स्पर्धा, संगीताचे कार्यक्रम घेणे, सहलींचे आयोजन करणे, एनजीओमार्फत आर्थिक मदत देणे, वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसोबत त्यांची भेट सातत्याने घडवणे, समुपदेशन करणे आदी कामे देखील करू शकतो. त्यांना योगासने आणि ध्यानधारणाही शिकवली तर त्याचे परिणाम निश्चित दिसू लागतील. एकूणच, समाजातील गुन्हेगारीची कारणे अनेक आहेत. पण, शेवटी गुन्हेगारी ही एक मानसिक वृत्ती असते. त्यामुळे समुपदेशन हा गुन्हेगारी कमी करण्याचा एक सशक्त मार्ग आहे. नियमित योगसाधना आणि ध्यानधारणेमुळे त्यांच्यामध्ये सकारात्मक वैचारिक बदल होतो. योगसाधनेचे तरुण गुन्हेगारांवर खूप चांगले परिणाम दिसून आलेले आहेत. सध्या शासनाच्या स्तरावर गुन्हेगारांना अशा कृत्यांपासून परावृत्त करण्यासाठी निश्चित अशी योजना नाही. त्यामुळे अशा योजना आखून पोलिस दलासोबत समाजकल्याण विभाग आणि एनजीओंना आणि समाजातील प्रत्येक घटकाने जबाबदारी स्वीकारल्यास गुन्हेगारी रोखता येईल आणि पुढील पिढी सुरक्षित आणि सुदृढ राहील, ती पिढी सुरक्षित, सुशिक्षित आणि सुदृढ राहिली तरच राष्ट्र अधिक बळकट होईल... इति लेखन सीमा...

**- विशाल वसंतराव मुळे आजेगावकर.**

# शोषित-पीडित-वंचितांच्या हक्कांसाठी लढणारे लोकनायक, साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा सामाजिक वारसा जपणारा युगपुरुष "ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नाही, तर कष्टकरी माणसाच्या तळहातावर पेललेली आहे."हे एक वाक्य उच्चारले की डोळ्यांसमोर उभे राहतात ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे. या एका वाक्यात त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेचा खरा इतिहास सांगितला. जगातील प्रत्येक संस्कृती, प्रत्येक सभ्यता आणि प्रत्येक प्रगतीचा पाया हा कष्टकरी, श्रमिक, शेतमजूर, कामगार आणि वंचित माणसाच्या घामावर उभा आहे. पण दुर्दैवाने इतिहास लिहिणाऱ्यांनी या कष्टकऱ्यांना विसरले. त्या विस्मृतीला शब्द देण्याचे काम अण्णाभाऊ साठे यांनी केले.आज त्यांच्या स्मृतिदिनी आपण एका साहित्यिकाला नव्हे, तर सामाजिक क्रांतीच्या महान योद्ध्याला अभिवादन करत आहोत. ज्यांनी लेखणीला तलवारीची धार दिली, शाहिरीला परिवर्तनाची मशाल बनवली आणि साहित्याला समाजमुक्तीचे शस्त्र बनवले. अण्णाभाऊ साठे यांचा जन्म अत्यंत गरिबीत झाला. शिक्षणाची दारे बंद होती, भूक रोजची सोबती होती आणि जातीव्यवस्थेने माणूस म्हणून जगण्याचाही अधिकार हिरावून घेतला होता. परंतु जीवनातील कटू अनुभवच त्यांच्या विद्यापीठात रूपांतरित झाले. त्यांनी समाजाला पुस्तकातून नव्हे, तर प्रत्यक्ष जगण्यातून वाचले. म्हणूनच त्यांचे साहित्य कृत्रिम वाटत नाही; ते समाजाच्या जखमांवर उमटलेले सत्य आहे.महात्मा ज्योतिराव फुले यांनी शोषणाविरुद्ध सत्यशोधक विचार दिला. त्यांनी शिक्षणाचा दीप प्रज्वलित करून बहुजन समाजाला अज्ञानाच्या अंधारातून बाहेर काढण्याचे महान कार्य केले. स्त्रीशिक्षण, शेतकरी, कामगार आणि अस्पृश्यांच्या प्रश्नांना त्यांनी समाजाच्या केंद्रस्थानी आणले. अण्णाभाऊ साठे यांच्या लेखणीतही याच सत्यशोधक विचारांचा स्पष्ट प्रभाव दिसतो. त्यांनीही उपेक्षितांच्या वेदनांना शब्द दिले आणि समाजाला आरसा दाखवला. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाला राज्यकारभाराचा पाया बनवला. शिक्षण, आरक्षण, समान संधी आणि सामाजिक समता यासाठी त्यांनी धाडसी निर्णय घेतले. शाहू महाराजांनी निर्माण केलेल्या सामाजिक न्यायाच्या पायावर पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांना घटनात्मक स्वरूप दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा." अण्णाभाऊ साठे यांनी हा संदेश आपल्या साहित्य, शाहिरी आणि लोककलेतून जनमानसापर्यंत पोहोचवला. बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून समाजाला अधिकार दिले, तर अण्णाभाऊंनी त्या अधिकारांसाठी लढण्याची जिद्द जागवली. बाबासाहेबांनी विचार दिला, अण्णाभाऊंनी त्या विचारांना लोकभाषा दिली.अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू हा माणूस आहे. जात, धर्म, पंथ, भाषा यापलीकडे जाऊन त्यांनी श्रमिकांच्या आयुष्याला साहित्याचा विषय बनवले. त्यांच्या कथा आणि कादंबऱ्यांमध्ये भूक आहे, अश्रू आहेत, संघर्ष आहे; पण त्याचबरोबर स्वाभिमान, प्रतिकार आणि आशाही आहे. म्हणूनच त्यांचे साहित्य आजही जिवंत आहे.'फकिरा' ही त्यांची कादंबरी केवळ साहित्यकृती नाही; ती अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचा इतिहास आहे. गुलामगिरी स्वीकारण्यापेक्षा स्वाभिमानासाठी लढण्याची प्रेरणा या कादंबरीतून मिळते. आजच्या पिढीने 'फकिरा' वाचणे म्हणजे संघर्षाचा अर्थ समजून घेणे होय.अण्णाभाऊ साठे हे केवळ लेखक नव्हते. ते लोकशाहीर होते. त्यांनी पोवाडे, लावण्या, लोकगीते आणि शाहिरीच्या माध्यमातून समाजजागृती केली. निरक्षर जनतेपर्यंत विचार पोहोचवण्यासाठी त्यांनी लोककलेचा प्रभावी वापर केला. त्यांच्या प्रत्येक गीतामध्ये परिवर्तनाचा आवाज होता.

आज समाजात विज्ञान, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल क्रांतीची चर्चा आहे. परंतु दुसरीकडे भूक, बेरोजगारी, जातीय भेदभाव, स्त्रियांवरील अत्याचार, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि सामाजिक विषमता अजूनही कायम आहे. या वास्तवामुळे अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य अधिकच समकालीन ठरते.आज गरज आहे ती अण्णाभाऊंना केवळ स्मृतिदिनी आठवण्याची नाही, तर त्यांच्या विचारांना आपल्या जीवनात उतरवण्याची. प्रत्येक शाळेत त्यांचे साहित्य वाचले गेले पाहिजे. प्रत्येक तरुणाने त्यांच्या संघर्षातून प्रेरणा घेतली पाहिजे. कारण समाज बदलायचा असेल तर विचार बदलावे लागतात आणि विचार बदलण्यासाठी साहित्य हे सर्वात प्रभावी माध्यम आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून माणुसकीचा धर्म शिकवला. त्यांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची हिंमत दिली. त्यांनी समाजाला सांगितले की, कष्ट करणारा माणूस हा समाजाचा खरा निर्माता आहे.त्यांच्या स्मृतिदिनी आपण एवढीच प्रतिज्ञा करूया महात्मा फुले यांचे शिक्षण, राजर्षी शाहू महाराजांचा सामाजिक न्याय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समता आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा संघर्ष यांचा वारसा आपण पुढील पिढीकडे अभिमानाने पोहोचवू.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते; ते संपूर्ण मानवतेच्या स्वाभिमानाचा आवाज होते.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन म्हणजे प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उभ्या राहिलेल्या असामान्य माणसाची प्रेरणादायी गाथा आहे. ज्यांच्या हातात कधी पुस्तक नव्हते, ज्यांना शाळेचे शिक्षण पूर्ण करता आले नाही, त्या व्यक्तीने मराठी साहित्यात असे अजरामर स्थान निर्माण केले की आज त्यांना "साहित्यसम्राट" म्हणून ओळखले जाते. ही केवळ प्रतिभेची नव्हे, तर जिद्दीची, आत्मविश्वासाची आणि समाजाप्रती असलेल्या अपार बांधिलकीची कहाणी आहे.

मुंबईत स्थलांतर केल्यानंतर अण्णाभाऊंनी गिरणी कामगार, हमाल, मजूर आणि झोपडपट्टीत राहणाऱ्या हजारो कुटुंबांचे दुःख जवळून अनुभवले. कष्टकरी माणसाचे आयुष्य हे केवळ उपजीविकेसाठीचा संघर्ष नसून सन्मानाने जगण्याची झुंज आहे, हे त्यांनी ओळखले. त्यामुळे त्यांच्या साहित्याचा नायक राजा-महाराजा नसून, घाम गाळणारा सामान्य माणूस आहे.महात्मा ज्योतिराव फुले यांनी शेतकरी, कामगार आणि बहुजन समाजाच्या दुःखाला शब्द दिले; राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाला शासनाचे धोरण बनवले; डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून समान हक्क दिले. अण्णाभाऊ साठे यांनी या तिन्ही महापुरुषांच्या विचारांना लोकभाषेत, लोकगीतांत आणि शाहिरीतून जनतेच्या मनापर्यंत पोहोचवले. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ मनोरंजन करणारे नाही, तर परिवर्तन घडवणारे साहित्य ठरले.

अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा विचार करताना 'फकिरा' या कादंबरीचा उल्लेख अपरिहार्य आहे. ही कादंबरी केवळ एका व्यक्तीची कथा नाही; ती शतकानुशतके अन्याय सहन करणाऱ्या समाजाच्या स्वाभिमानाची कथा आहे. अन्यायाविरुद्ध झगडणारा, माणुसकीसाठी लढणारा आणि सन्मानासाठी प्राण पणाला लावणारा 'फकिरा' हा आजही संघर्षाचे प्रतीक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या आत्मसन्मानाच्या विचारांचे साहित्यिक रूप म्हणजे 'फकिरा' असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. ही कादंबरी आजच्या युवकांनी वाचली तर त्यांना समजेल की स्वातंत्र्य आणि सन्मान हे सहज मिळत नाहीत; त्यासाठी संघर्ष करावा लागतो.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि अण्णाभाऊंची शाहिरी

भाषिक राज्यांच्या निर्मितीसाठी झालेल्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या शाहिरीच्या माध्यमातून जनतेत प्रचंड ऊर्जा निर्माण केली. त्यांनी लिहिलेली आणि गायलेली पोवाडे, लोकगीते आणि प्रेरणादायी शाहिरी जनतेला रस्त्यावर उतरवणारी ठरली. त्यांच्यासाठी कला ही केवळ मनोरंजनाचे साधन नव्हती; ती सामाजिक परिवर्तनाची प्रभावी चळवळ होती.कामगारांचा आवाज

गिरणी कामगारांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने लेखन केले. कामगार हा उद्योगाचा कणा आहे, परंतु त्यालाच उपेक्षित ठेवले जाते, ही वेदना त्यांच्या साहित्यात वारंवार दिसते. त्यांनी श्रमिकांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. म्हणूनच त्यांच्या लेखणीतून निघणारा प्रत्येक शब्द हा श्रमाचा सन्मान करणारा शब्द आहे.

आजही असंघटित कामगार, स्थलांतरित मजूर, बांधकाम कामगार आणि कष्टकरी वर्ग अनेक समस्यांना तोंड देत आहे. अशा वेळी अण्णाभाऊंचे विचार मार्गदर्शक ठरतात. ते सांगतात की विकासाचा अर्थ केवळ उंच इमारती नव्हे; तर त्या इमारती उभारणाऱ्या कामगारांच्या जीवनातही आनंद आणि सन्मान असला पाहिजे.रशियापर्यंत पोहोचलेले साहित्य

अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची लोकप्रियता भारतापुरती मर्यादित राहिली नाही. त्यांच्या अनेक साहित्यकृतींचे विविध भाषांमध्ये भाषांतर झाले. विशेषतः तत्कालीन सोव्हिएत रशियामध्ये त्यांच्या साहित्याला मोठा सन्मान मिळाला. तेथे त्यांचे स्वागत एका लोककवीप्रमाणे झाले. हे त्यांच्या साहित्याच्या सार्वत्रिक मानवी मूल्यांचे द्योतक आहे.शिक्षणाचा औपचारिक लाभ न मिळालेला एक साहित्यिक आपल्या लेखणीच्या बळावर जगभर पोहोचतो, ही घटना भारतीय साहित्याच्या इतिहासातील अभिमानाची बाब आहे.लोकशाहीर म्हणजे जनतेचा आवाज अण्णाभाऊ साठे यांना 'लोकशाहीर' ही पदवी केवळ त्यांच्या गायनामुळे मिळाली नाही. जनतेचे दुःख, आशा, स्वप्ने आणि संघर्ष यांना आवाज देणारा कलाकार म्हणजे लोकशाहीर. त्यांनी आपल्या शाहिरीतून भूक, विषमता, अन्याय, जातिभेद, शोषण आणि श्रमिकांचे प्रश्न निर्भीडपणे मांडले.त्यांच्या शाहिरीत क्रांतीचा ज्वालामुखी आहे, पण त्याचबरोबर माणुसकीची करुणाही आहे. म्हणूनच त्यांचे साहित्य आजही लोकांच्या मनाला स्पर्श करते.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनी आपण केवळ एका महान साहित्यिकाचे स्मरण करत नाही, तर भारतातील सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एका तेजस्वी पर्वाला अभिवादन करतो. त्यांच्या हातात सत्ता नव्हती, संपत्ती नव्हती, विद्यापीठाच्या पदव्या नव्हत्या; पण त्यांच्या हातात होती समाजाची वेदना, अन्यायाविरुद्धची अस्वस्थता आणि परिवर्तन घडविण्याची प्रखर जिद्द. म्हणूनच त्यांचे साहित्य काळाच्या कसोटीवर आजही तितकेच जिवंत आणि प्रेरणादायी आहे.

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यांची हमी दिली आहे. ही मूल्ये केवळ घटनापुस्तकातील शब्द नाहीत; ती भारताच्या नव्या समाजरचनेची दिशा आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या मूल्यांना घटनात्मक स्वरूप दिले, परंतु ती मूल्ये सामान्य जनतेच्या मनात रुजवण्याचे कार्य अनेक समाजप्रबोधकांनी केले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे त्यांपैकी अग्रगण्य होते.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी अज्ञानाच्या अंधारात ज्ञानाचा दीप प्रज्वलित केला. त्यांनी शिकवले की शिक्षणाशिवाय मुक्ती नाही. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाला शासनाची दिशा दिली आणि वंचित समाजाला संधी मिळाली पाहिजे, हा विचार कृतीत उतरवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या सर्व संघर्षांना संविधानाची ताकद दिली. अण्णाभाऊ साठे यांनी या तिन्ही महापुरुषांच्या विचारांना लोकभाषेतील शब्द, लोककलेतील सूर आणि संघर्षाची ऊर्जा दिली.

आज प्रश्न असा आहे की आपण त्यांच्या वारशाचे काय केले?

आजही जातीच्या नावावर माणसांची विभागणी होते. कष्टकरी हातांना योग्य मोबदला मिळत नाही. शेतकरी कर्जबाजारी होतो. स्थलांतरित कामगार आजही असुरक्षित जीवन जगतात. महिलांवरील अन्याय, बालमजुरी, बेरोजगारी आणि सामाजिक विषमता अनेक रूपांत आपल्या समोर उभी आहे. तंत्रज्ञान झपाट्याने पुढे गेले, पण माणुसकी त्याच वेगाने पुढे गेली का? हा प्रश्न अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य आजही आपल्या मनाला विचारते.

त्यांनी आपल्याला शिकवले की साहित्य हे केवळ मनोरंजनासाठी नसते; ते समाजाला जागवण्यासाठी असते. लेखणी ही फक्त शब्द लिहिण्यासाठी नसते; ती अन्यायाला प्रश्न विचारण्यासाठी असते. कलाकार हा फक्त रंगमंचावर उभा राहणारा नसतो; तो समाजाच्या विवेकाला जागवणारा असतो.

अण्णाभाऊ साठे यांचे जीवन नव तरुणांना सांगते की दारिद्र्य माणसाला लहान बनवत नाही; विचारांचा अभाव माणसाला लहान बनवतो. समाजाने ज्याला वंचित मानले, त्यानेच आपल्या लेखणीतून संपूर्ण समाजाला विचार करायला भाग पाडले. हीच त्यांच्या जीवनाची सर्वात मोठी क्रांती आहे. आज जर अण्णाभाऊ साठे आपल्या समोर उभे असते, तर कदाचित ते एवढेच म्हणाले असते "माझ्या नावाने घोषणा देण्यापेक्षा, एखाद्या उपाशी माणसाला अन्न द्या. माझ्या प्रतिमेला हार घालण्यापेक्षा, एखाद्या गरीब मुलाच्या हातात पुस्तक द्या. माझ्या साहित्याची स्तुती करण्यापेक्षा, अन्यायाविरुद्ध निर्भयपणे उभे राहा. कारण तेथेच माझा खरा श्वास जिवंत राहील. खऱ्या अर्थाने आजच्या दिवशी आपण एक प्रतिज्ञा घेतली पाहिजे."महात्मा फुले यांचा शिक्षणाचा दीप कधी विझू देणार नाही.राजर्षी शाहू महाराजांचा सामाजिक न्यायाचा मार्ग कधी सोडणार नाही.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानिक मूल्यांशी कधी तडजोड करणार नाही.आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी दाखविलेल्या संघर्ष, स्वाभिमान, श्रमप्रतिष्ठा आणि मानवतेच्या वाटेवर अखंड चालत राहू.कारण...

जोपर्यंत या देशात एकही उपाशी पोट आहे, एकही शोषित माणूस आहे, एकही वंचित बालक शिक्षणापासून दूर आहे, एकही कष्टकरी अन्याय सहन करत आहे तोपर्यंत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार जिवंत राहतील. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे नाव नाही तो स्वाभिमानाचा ज्वालामुखी आहे.ते व्यक्तिमत्त्व नाही ती सामाजिक परिवर्तनाची अखंड चळवळ आहे.ते साहित्यिक नाहीत ते शोषितांच्या अश्रूंना शब्द देणारे युगपुरुष आहेत. आजच्या स्मृतिदिनी या महान लोकनायकाला, साहित्यसम्राटाला, श्रमिकांच्या अस्मितेच्या महान शिल्पकाराला विनम्र, कृतज्ञ आणि कोटी-कोटी अभिवादन! "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अमर राहोत!त्यांचे विचार प्रत्येक भारतीयाच्या मनात सदैव जागृत राहोत. जय भिम जय संविधान. लेखक हे महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त आहेत.

**लेखक**
**समाजभूषण रामदास वच्छालामाई रखमाजी वाघमारे**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं.8888125610**

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# जगदंबा शक्तिपीठत महामंडलेश्वर पट्ट अभिषेक सोहळा संपन्न



**परभणी / प्रतिनिधी :** जगदंबा शक्तीपीठ आखाडा कार्यक्षेत्र अखंड भारत च्या वतीने संभाजीनगर येथे पट्ट अभिषेक सोहळा आयोजित करण्यात आला होता यामध्ये पाच महामंडलेश्वर यांचा पट्टा अभिषेक सोहळा संपन्न झाला

आयोजित समारंभास पट अभिषेक सोहळ्यासाठी जगदंबा शक्तिपीठ आखाड्याचे प्रमुख तथा अध्यक्ष श्री श्री 1008 महामंडलेश्वर धर्मगुरू डॉ श्री प्रदीप चैतन्य फाले महाराज, व तसेच आव्हान आखाड्याचे महामंडलेश्वर तथा जगदंबा शक्ती पीठ आखाड्याचे महामंत्री श्री श्री 1008 महामंडलेश्वर डॉ श्री विशालानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला यावेळी कर्नाटक राज्यातील बेनकनळी बिदर येथील श्री श्री 1008 महामंडलेश्वर श्री कैलास नंदाजी सरस्वती महाराज,, श्री श्री 1008 महामंडलेश्वर श्री सचिदानंद गुरु अशोक पवार सरस्वती महाराज, श्री श्री 1008 महामंडलेश्वर श्री रामानंद सरस्वती महाराज, श्री श्री 1008 नंदाताई आळंदीकर महाराज, श्री श्री 1008 महामंडलेश्वर श्री विकास नंदजी नवले सरस्वती महाराज लातूरकर, यांना महामंडलेश्वर पदवी बहाल करण्यात आली व त्यांचा शाल देऊन सन्मान करण्यात आला.

# इद्रिस मुलतानी यांच्या प्रयत्नाला यश; सोयगाव तालुक्यात शासकीय ज्वारी खरेदीचा प्रश्न मार्गी

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१८ जुलै :** रब्बी हंगामात सिल्लोड-सोयगाव तालुक्यात ज्वारीचे बंपर उत्पादन झाले होते.शासनाने दिलेले 10000 क्विंटल चे ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण झाले होते. मात्र तरीही शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात ज्वारी शिल्लक असल्याने शेतकरी अडचणीत आला होता. शेतकऱ्यांची ही व्यथा लक्षात घेऊन भारतीय जनता पार्टी अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी मागील आठवड्यात राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची मुंबई येथे भेट घेतली होती.यावेळी त्यांनी सोयगाव तालुक्यासाठी पुन्हा 10000 क्विंटल चे अतिरिक्त उद्दिष्ट मंजूर करावे आणि खरेदीला मुदतवाढ द्यावी, अशी ठोस मागणी केली होती. मंत्र्यांनी यावर सकारात्मक आश्वासन दिले होते.

त्या आश्वासनाची पूर्तता आज झाली आहे.शासनाने सोयगाव तालुक्यासाठी अतिरिक्त ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट मंजूर केले असून, ३१ ऑगस्ट पर्यंत ज्वारी आणि बाजरी खरेदीला मुदतवाढ देण्यात आली आहे. या निर्णयामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.हमीभावाने शासकीय केंद्रावर ज्वारी विक्री करता येणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये आणि कष्टकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. इद्रिस मुलतानी यांनी सातत्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पाठपुरावा केल्याबद्दल शेतकऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# प्रभाकर आबा काळे यांचा श्री अमृतेश्वर शिक्षक पतसंस्था व शिक्षक संघ यांच्याकडून सत्कार



**सोयगाव,दि.१८ ( प्रतिनिधी) :** जिल्हा मध्यवर्ती बँक छत्रपती संभाजीनगरच्या संचालक पदी निवडीबद्दल प्रभाकर (आबा) काळे यांचा म.रा.प्रा शिक्षक संघ व श्री अमृतेश्वर शिक्षक पतसंस्था सोयगाव व तथा जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव यांचे वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी श्री अमृतेश्वर शिक्षक पतसंस्था सोयगावचे चेअरमन व संचालक मंडळ,शिक्षक संघ पदाधिकारी,जिल्हा परिषद प्रशाला मुख्याध्यापक व सर्व शिक्षक मित्र परिवार यांची उपस्थिती होती.अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा दिल्या

# गुंठेवारीची 50 टक्के सूट घरांसाठी लागू करा; नगरसेवक राजू वैद्य यांची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महापालिकेने भूखंडांच्या गुंठेवारीसाठी ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे, मात्र बांधकाम केलेल्या घरांसाठी कोणताही दिलासा दिलेला नाही. त्यामुळे गुंठेवारीसाठी अल्प प्रतिसाद मिळत असून, बांधलेल्या घरांसाठीही गुंठेवारी शुल्कात ५० टक्के सवलत देण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक राजू वैद्य यांनी मनपा आयुक्तांकडे केली आहे.

शुक्रवार (दि. १७) रोजी त्यांनी यासंदर्भात आयुक्तांना निवेदन दिले. राजू वैद्य यांनी निवेदनात म्हटले आहे की, गुंठेवारी प्रक्रियेतील किचकट व अनावश्यक अटी कमी करून ही प्रक्रिया अधिक सुटसुटीत करावी. तसेच प्रत्येक महिन्यात सर्व व्यावसायिक अभियंते व वास्तुविशारद यांची बैठक घेऊन त्यांच्या अडचणी जाणून त्या दूर कराव्यात. ३१ डिसेंबर २०20 पर्यंतच्या बांधकामांना नियमित करता येते, मात्र मागील पाच वर्षांत शहरात वसाहती वाढल्या असून, ३१ डिसेंबर २०२४ पूर्वीच्या बांधकामांना गुंठेवारीच्या कक्षेत आणावे, अशी मागणीही त्यांनी केली. यापूर्वी खुल्या भूखंडांचे गुंठेवारी नियमितीकरण करून घेतलेल्या नागरिकांनी त्यावर घरे बांधली आहेत.

आता या घर बांधकामाचे नियमितीकरण करण्यास गुंठेवारी विभागातील अधिकाऱ्यांकडून नकार दिला जात आहे. अशा नागरिकांचे बांधकाम गुंठेवारीअंतर्गत नियमित करण्यात यावे, असे राजू वैद्य यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# आसराबाई सर्जेराव होले यांचे निधन



**बिडकीन दि १८ जुलै :** आसराबाई सर्जेराव होले वय (९०) रा बिडकीन ता पैठण यांचे दि १७ शुक्रवार रोजी ५.१५ वाजता वृद्धापकाळाने दुःखत निधन झाले असून तिच्या पार्थिवावर आज दि १८ शनिवार रोजी सकाळी दहा वाजता बिडकीन येथील शेकटा फाटा अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले, पश्चात, दोन मुलं दोन मुली सुना जावई नातवंड असा परिवार आहे.

# 'परभणी ग्रोथ हब'च्या माध्यमातून कृषि उद्योगांना नवी दिशा : पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी:**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, चेंबर फॉर अॅडव्हान्समेंट ऑफ स्मॉल अँड मिडियम बिझनेसेस (CASMB) तथा सेवा भारती, देवगिरी (जि. परभणी) यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक १८ जुलै २०२६ रोजी विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील सिम्पोझियम हॉलमध्ये 'उद्यम विकसित मराठवाडा मिशन' अंतर्गत उद्योग–शैक्षणिक संवाद कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कृषि क्षेत्रातील उद्योग, मूल्यवर्धन, उद्योजकता विकास आणि रोजगारनिर्मिती या विषयांवर या कार्यक्रमात सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा आणि स्वच्छता, ऊर्जा, महिला आणि बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा पालकमंत्री (परभणी जिल्हा) माननीय ना. श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि होते.

यावेळी चेंबर फॉर अॅडव्हान्समेंट ऑफ स्मॉल अँड मिडियम बिझनेसेसचे सरचिटणीस डॉ. उमेश कांबळे, रांजणी (जि. धाराशिव) येथील नॅचरल उद्योग समूहाचे प्रकल्प समन्वयक श्रीपाद ठोंबरे, वसमत येथील भूमी न्यूट्रास्युटिकल्सचे अतिश साळुंखे, खाद्य तंत्रज्ञान क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ सतीश भोरकडे, शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे तसेच अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेश क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख पाहुण्या राज्यमंत्री तथा पालकमंत्री (परभणी जिल्हा) माननीय ना. श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, विद्यार्थी केवळ नोकरी शोधणारे नव्हे तर नोकरी निर्माण करणारे उद्योजक बनले पाहिजेत. कृषिआधारित उद्योगांच्या माध्यमातून परभणी तसेच मराठवाड्यातील स्थलांतर थांबविणे शक्य आहे. शेतीला प्रक्रिया उद्योग व पूरक व्यवसायांची जोड दिल्याशिवाय शेती अधिक लाभदायक होणार नाही. एकात्मिक शेती पद्धतीचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. त्या पुढे म्हणाल्या की, 'परभणी ग्रोथ हब' या संकल्पनेअंतर्गत सुमारे दीड हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे नियोजन करण्यात आले असून, परभणी जिल्ह्यात 'सिल्क अँड मिल्क' या संकल्पनेवर आधारित पायलट प्रकल्प राबविण्यात येणार आहे. कृषिआधारित उद्योगांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा, तांत्रिक मार्गदर्शन व शासनाचे सर्वतोपरी सहकार्य उपलब्ध करून दिले जाईल. कृषि पदवीधरांनी शेतीकडे उद्योजकीय दृष्टीने पाहावे, कारण शेतीतूनही मोठे उद्योग उभे राहू शकतात, असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी सांगितले की, यशस्वी उद्योजकासाठी गंभीरता, विनम्रता, सहनशीलता आणि सातत्य हे गुण अत्यावश्यक आहेत. मराठवाड्यात कृषिआधारित उद्योगांसाठी मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध असून, परभणी जिल्ह्याची सुपीक जमीन, सक्षम मनुष्यबळ आणि कृषि संशोधनाची मजबूत पार्श्वभूमी ही मोठी ताकद आहे. "परभणी फर्स्ट" हा विकासाचा नारा प्रत्यक्षात उतरविण्यासाठी उद्योग, शिक्षण संस्था आणि शासन यांनी एकत्रितपणे कार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील शेतकरी गटांनी शेतीमालाच्या सामूहिक विक्रीची यशस्वी व्यवस्था उभी केली आहे. वसमत तालुक्यात करवंदासारख्या वनउत्पादनावर प्रक्रिया उद्योग सुरू असून, विद्यापीठाला अलीकडेच चार महत्त्वपूर्ण संशोधन प्रकल्प मंजूर झाले आहेत. या संशोधनाचा लाभ उद्योग, शेतकरी आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उद्योजक श्री. श्रीपाद ठोंबरे यांनी सांगितले की, मराठवाड्यातील दुष्काळी भागात दुग्धव्यवसाय हा शाश्वत उत्पन्नाचा विश्वासार्ह स्रोत ठरत आहे. धाराशिव जिल्ह्यात दुग्धव्यवसायाला चालना मिळाल्यानंतर शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून आले आहे. इथेनॉल निर्मितीमुळे ऊस उत्पादकांना अधिक दर मिळत असून, शेतकरी हा केवळ अन्नदाता नसून उर्जादाताही आहे, असे ते म्हणाले. ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी उद्योगांनी खेड्यांकडे वाटचाल करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

श्री.अतिश साळुंखे यांनी उद्योग क्षेत्रातील बदलत्या संधींचा वेध घेताना तंत्रज्ञानाधारित कौशल्य असलेल्या मनुष्यबळाची वाढती गरज अधोरेखित केली. ग्रामीण भागातील युवकांनी नवकल्पना, प्रक्रिया उद्योग आणि स्टार्टअपच्या माध्यमातून उद्योजकतेकडे वळावे, असे आवाहन त्यांनी केले.

खाद्य तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ श्री. सतीश भोरकडे यांनी अडचणी या संधी निर्माण करण्याचे माध्यम असतात. चिकाटी, सातत्य आणि नावीन्यपूर्ण विचार यांच्या बळावर यशस्वी उद्योग उभा राहू शकतो, असे प्रतिपादन केले.

प्रास्ताविकात डॉ. उमेश कांबळे यांनी 'उद्यम विकसित मराठवाडा मिशन'ची भूमिका स्पष्ट करताना उद्योजकता विकासासाठी मराठवाड्यात विविध जिल्ह्यांमध्ये उद्योग–शैक्षणिक संवाद मेळावे आयोजित करण्यात येत असल्याची माहिती दिली. या उपक्रमातून उद्योग, शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था आणि शासन यांच्यात समन्वय निर्माण करून स्थानिक युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास जिल्ह्यातील उद्योजक, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, कृषि प्रक्रिया उद्योग क्षेत्रातील व्यावसायिक,

# 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत एक हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

## शिशु विहार शाळेतील कार्यक्रमात कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांची प्रमुख उपस्थिती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत शिशु विहार शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले तसेच त्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी भाजपचे शहर-जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, महापौर समीर राजूरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभापती अनिलभैय्या मकरीये यांच्या पुढाकाराने करण्यात आले. मान्यवरांनी आपल्या मनोगतात शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगत, समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करणे ही सामाजिक बांधिलकी असल्याचे नमूद केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयीची प्रेरणा वाढते आणि त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक बळ मिळते, असेही त्यांनी सांगितले. 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत शहरातील शिशु विहार शाळा, गुजराती विद्या मंदिर आणि मनपा प्राथमिक शाळा येथे एकूण १,००० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी स्वागत करत आयोजकांचे आभार मानले.

# संवेदना प्रकल्पाच्या आढावा बैठकीत मानसिक आरोग्य जनजागृतीवर भर



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट आणि एमपॉवर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'संवेदना' मानसिक आरोग्य प्रकल्पाच्या आढावा बैठका टोणगाव, लडगाव आणि शर्णापूर येथे उत्साहात पार पडल्या. प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी माधव जोशी, उपाध्यक्ष मेल्विन, मुख्य वित्तीय अधिकारी अमित गुप्ता, महाव्यवस्थापक (विशेष प्रकल्प) डॉ. तान्या कौल, वरिष्ठ प्रकल्प समन्वयक ज्योती मोरे आणि प्रकल्प समन्वयक सतीश प्रधान यांनी गावांना भेट दिली.

यावेळी मान्यवरांनी ग्रामस्थांशी मुक्त संवाद साधत मानसिक आरोग्याविषयी जनजागृती, प्रकल्पाचा गावपातळीवरील प्रभाव, नागरिकांच्या अपेक्षा आणि स्थानिक अडचणी याबाबत चर्चा केली. सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, तंटामुक्ती समितीचे पदाधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, सीआरपी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रकल्प अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक सूचना व मार्गदर्शनही करण्यात आले.

यानंतर मान्यवरांनी आर्मी फोर्स अकॅडमीला भेट देऊन इन्चार्ज इंगळे यांच्याशी चर्चा केली. मागील वर्षी आयोजित मानसिक आरोग्य जनजागृती कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या सकारात्मक बदलांचा आढावा घेण्यात आला. भविष्यात अशा उपक्रमांना सातत्य देत मानसिक आरोग्याविषयी जनजागृती अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# जिंतूरमध्ये पतंजली योग समिती व भारत स्वाभिमानची राज्यस्तरीय बैठक संपन्न

## योगाचा प्रसार, संघटन बळकटी आणि आगामी उपक्रमांवर सविस्तर चर्चा



**जिंतूर :** येथील साई सृष्टी गार्डन, वरुड रोड येथे महाराष्ट्र पश्चिम राज्यातील भारत स्वाभिमान व पतंजली योग समितीच्या राज्य कार्यकारिणी सदस्यांची एकदिवसीय बैठक पार पडली.

बैठकीस प्रल्हादजी हर्बक (माऊली), भारत स्वाभिमान सह राज्य प्रभारी (महाराष्ट्र पश्चिम) यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. त्यांनी योगाचे वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय जीवनातील महत्त्व अधोरेखित करत प्रत्येक गावात नियमित योगवर्ग सुरू करण्याचे आवाहन केले. तसेच पतंजली योग समितीचे संघटन अधिक सक्षम करण्यासाठी कार्यकर्त्यांनी समर्पित भावनेने कार्य करावे, सदस्य नोंदणी, जनजागृती आणि आगामी उपक्रम प्रभावीपणे राबविण्याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी धोंडीरामजी शेप (भारत स्वाभिमान जिल्हा प्रभारी, परभणी तथा राज्य कार्यकारिणी सदस्य, महाराष्ट्र पश्चिम), वसंतरावजी देशमुख (जिल्हा कोषाध्यक्ष, परभणी), निखिलजी वंजारे (पतंजली योग समिती जिल्हा प्रभारी, परभणी), पुरुषोत्तमजी अंभूरे (भारत स्वाभिमान तहसील प्रभारी, जिंतूर), अॅड. गोपाळराव देशपांडे (पतंजली योग समिती तहसील प्रभारी), लखुजी जाधव (पतंजली किसान सेवा समिती प्रभारी, जिंतूर), सचिनजी रायपत्रीवार (सोशल मीडिया तहसील प्रभारी, जिंतूर), कामाजी जवादे (सोशल मीडिया तहसील प्रभारी, गंगाखेड) तसेच ज्ञानोबाजी बरसाले (भारत स्वाभिमान तहसील प्रभारी, सेलू) उपस्थित होते. बैठकीत संघटन विस्तार, योग प्रशिक्षण, सामाजिक उपक्रम, सदस्य नोंदणी आणि आगामी कार्यक्रमांच्या नियोजनावर सखोल चर्चा करण्यात आली. राज्यस्तरीय नेतृत्वाच्या मार्गदर्शनामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी काळात पतंजली योग समितीचे कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# कंपनीत चोरी करणारा आरोपी मुद्देमालासह एमआयडीसी पोलिसांनी केला जेरबंद

अहिल्यानगर : एमआयडीसी येथील मॅट्रीक्स नागापूर इंजिनीअरिंग टेकनिक्स कंपनीच्या समोरून मुद्देमाल चोरी करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे. ऋषिकेश बद्रीनाथ गायकवाड (वय २२, रा. दरंदले गल्ली, सोनई, ता. नेवासा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून चोरीला गेलेला सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, ग्रामीण उपअधीक्षक शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि हेमंत थोरात, सफौ राकेश खेडकर, पोहेकॉ संदीप पवार, शैलेश रोहोकले, राजू सुद्रीक, पोकों दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, राहुल गुंडू आणि अरुण सांगळे यांच्या पथकाने केली.

# कृषि अभियांत्रिकी पदवीधरांसाठी सुवर्णकाळ; शासकीय सेवेत वाढत्या संधी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधि



**परभणी :**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे सन १९८६ मध्ये कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. या विद्याशाखेतील पदवीधर शासकीय सेवेसह सिंचन (इरिगेशन) कंपन्या, पाणलोट विकास कार्यक्रम, कृषि प्रक्रिया उद्योग, कृषि अवजारे व यंत्रसामग्री निर्मिती उद्योग, ट्रॅक्टर व संबंधित उद्योग, बीजप्रक्रिया केंद्रे, अपारंपरिक ऊर्जा साधनांशी संबंधित उद्योग, कृषि स्थापत्य क्षेत्र तसेच इतर विविध कृषिपूरक क्षेत्रांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत.

महाराष्ट्र शासनाने मृद व जलसंधारण विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेचा सुधारित आकृतीबंध दिनांक २७ मे २०२६ रोजी मंजूर केला आहे. या सुधारित आकृतीबंधामध्ये कृषि अभियांत्रिकी विद्याशाखेस सुमारे ४० टक्के पदांना मान्यता देण्यात आली असून, त्यांची संख्या २,३९५ इतकी आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या विविध योजना तसेच मृद व जलसंधारणाशी संबंधित कामे अधिक गुणवत्तापूर्ण पद्धतीने राबविण्यास मदत होणार असून, या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीस मोठी चालना मिळणार आहे.

याशिवाय, राज्यातील कृषि विद्यापीठांच्या आस्थापनेवरील गट-अ व गट-ब संवर्गातील पदांच्या सुधारित आकृतीबंधास दिनांक १० जून २०२६ रोजी मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्यासाठी सुमारे २५० ते ३०० कृषि अभियंत्यांना सेवासंधी उपलब्ध होणार आहेत.

सध्या सहाव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशींनुसार कृषि अभियांत्रिकीचा नवीन अभ्यासक्रम राबविण्यात येत असून, मॉडेल अॅक्ट-२०२३ नुसार शैक्षणिक पदांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे कृषि अभियांत्रिकी पदवीधरांसाठी शासकीय सेवेमध्ये रोजगाराच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत.

माननीय केंद्रीय कृषिमंत्री श्री. शिवराज सिंह चौहान जी यांनी दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ रोजी माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या पत्रामध्ये महाराष्ट्रात कृषि अभियांत्रिकीचा स्वतंत्र संवर्ग निर्माण करण्याबाबत कार्यवाही सुरू असल्याचा उल्लेख केला आहे. हा संवर्ग अस्तित्वात आल्यानंतर कृषि अभियंत्यांसाठी शासकीय सेवेत आणखी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

तसेच महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाचा सुधारित आकृतीबंधही लवकरच मंजूर होण्याची अपेक्षा असून, त्यामध्येही कृषि अभियंत्यांसाठी विविध पदांची निर्मिती होण्याची शक्यता आहे. याशिवाय, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला येथील अधिकारी व कर्मचारी पदांच्या संवर्गनिहाय सुधारित आकृतीबंधास दिनांक १६ जून २०२६ रोजी मंजुरी देण्यात आली असून, त्यामध्येही कृषि अभियंत्यांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

वरील सर्व बाबींचा विचार करता कृषि अभियंत्यांना मृद व जलसंधारण विभाग, कृषि विद्यापीठे, कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ तसेच इतर शासकीय व निमशासकीय संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे कृषि अभियांत्रिकी या विद्याशाखेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

म्हणूनच विद्यार्थ्यांनी कृषि अभियांत्रिकी या विद्याशाखेला प्राधान्याने प्रवेश घेऊन कृषि क्षेत्रात कार्य करण्याचे आपले स्वप्न साकार करावे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने भारतीय व महाराष्ट्रातील शेती अधिक सक्षम, समृद्ध आणि शाश्वत करण्यासाठी योगदान द्यावे. तसेच "उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी" या आपल्या पारंपरिक ब्रीदवाक्याला आधुनिक संदर्भात नव्याने अर्थ प्राप्त करून देत कृषि क्षेत्रात मानाचे स्थान निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहावे.

# शिक्षणाबरोबर खेळ व आरोग्यालाही प्राधान्य द्या : डॉ. आदित्य येळीकर

## देवगिरी कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थी-पालक-शिक्षक मेळाव्यात करिअर मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षण हे जीवनातील यशाचे भक्कम अधिष्ठान असले तरी त्यासोबतच खेळ, शारीरिक तंदुरुस्ती आणि उत्तम आरोग्याचीही तितकीच काळजी घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या स्पर्धेत न अडकता स्वतःची आवड, क्षमता आणि कौशल्य ओळखून करिअरची दिशा निश्चित करावी, असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे डॉ. आदित्य येळीकर यांनी केले.






देवगिरी कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित विद्यार्थी-पालक-शिक्षक मेळाव्यात ते बोलत होते. महाविद्यालयाच्या रवींद्रनाथ टागोर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रवि पाटील होते. व्यासपीठावर उपप्राचार्य तथा जेईई-नीट सेल संचालक प्रा. अरुण काटे, उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर हिवरे आणि प्रा. विजय नलावडे उपस्थित होते.

डॉ. येळीकर यांनी विद्यार्थ्यांना स्टीव्ह जॉब्स यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचा दाखला देत ध्येय, सातत्य आणि संघर्षाच्या बळावर यश संपादन करता येते, असा संदेश दिला. अभियांत्रिकी, वैद्यकीय, तंत्रज्ञान, संशोधन, व्यवस्थापन, कला, क्रीडा, प्रशासन आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांतील करिअरच्या संधींचा विद्यार्थ्यांनी गांभीर्याने विचार करावा, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात प्रा. अरुण काटे यांनी महाविद्यालयाचे वार्षिक नियोजन, शिस्त, स्वच्छता, सुरक्षा, अभ्यासक्रम आणि विविध उपक्रमांची माहिती दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी राबविण्यात येणारे विविध अभ्यासक्रम, योजना आणि जेईई-नीट सेलच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाची सविस्तर माहिती त्यांनी पालकांना दिली. महाविद्यालयातील प्रत्येक शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञानापासून यशापर्यंत पोहोचविण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. रवि पाटील यांनी देवगिरी महाविद्यालयाची वैभवशाली परंपरा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा आढावा घेतला. अकरावी-बारावी या दोन वर्षांचे नियोजनबद्ध अध्ययन करून विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांची स्वप्ने पूर्ण करावीत, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात पालकांच्या विविध प्रश्नांना मान्यवरांनी समाधानकारक उत्तरे दिली. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून श्रुती देशपांडे आणि जगदीश देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. बाळासाहेब शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. किरण पतंगे, डॉ. शिवांगी खंदारे आणि सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## लोकनेते अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त देवगिरी महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, छत्रपती संभाजीनगर आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री लोकनेते अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त बुधवार, 22 जुलै रोजी देवगिरी महाविद्यालयात सकाळी 9 ते दुपारी 4 या वेळेत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून आयोजित या शिबिराचे उद्‌घाटन मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे.

या शिबिरात शहरातील नागरिक, युवक, विद्यार्थी आणि रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन माजी आमदार सतीश चव्हाण, देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवी पाटील तसेच शिबिराचे मुख्य समन्वयक उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते आणि संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## मानवतावादी सेवेला 'समाजरत्न'चा बहुमान; माई वृद्धाश्रमाच्या संचालिका मीरा वाघमारे यांचा गौरव

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** निस्वार्थ समाजसेवा, निराधार वृद्धांच्या जीवनात मायेचा आधार निर्माण करण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत राष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी समिती, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने माई वृद्धाश्रमाच्या संचालिका सौ. मीरा रामदास वाघमारे यांना प्रतिष्ठेचा 'समाजरत्न पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित दिमाखदार पुरस्कार वितरण सोहळ्यात सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP) सागर देशमुख, पोलीस उपनिरीक्षक तथा दामिनी पथक प्रमुख लता जाधव, वरिष्ठ प्रादेशिक परिवहन अधिकारी (RTO) आठवले साहेब, महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकारी गायकवाड मॅडम, राष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी समितीचे संस्थापक सय्यद साबेर तसेच सचिव मोहम्मद अखिल अहमद यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.




सौ. मीरा वाघमारे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून निराधार, उपेक्षित आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी स्वतःला समर्पित केले आहे. माई वृद्धाश्रमाच्या माध्यमातून त्यांनी अनेक वृद्धांना केवळ निवारा नव्हे, तर सन्मानाने जगण्याचा आत्मविश्वास दिला आहे. शिक्षण, महिला सक्षमीकरण, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेची जपणूक या क्षेत्रांतील त्यांच्या कार्यामुळे समाजात एक आदर्श निर्माण झाला असून, त्यांच्या या सेवाभावी कार्याची राज्यस्तरावर दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

पुरस्कारानंतर विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी सौ. मीरा वाघमारे यांचे अभिनंदन करत त्यांच्या कार्याला सलाम केला. सामाजिक न्याय मंत्री तथा शहराचे पालकमंत्री संजयजी शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग सक्षमीकरण मंत्री अतुलजी मोरेश्वर सावे, उपमहापौर राजेंद्रजी जंजाळ, नगरसेवक जालिंदरजी शेंडगे, नगरसेवक कैलासजी गायकवाड, नगरसेविका पुष्पाताई नीलपगारे, मातोश्री वृद्धाश्रमाचे सागर पागोरे, पार्वती वृद्धाश्रमाचे धनराज हजारे, आधार वृद्धाश्रमाचे गणेश डोनगावकर, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष शिवाजीराव फड, जनसेवा व्यसनमुक्ती केंद्राचे प्रा. आदिनाथ शेरकर तसेच समाजभूषण रामदास वाघमारे यांनी त्यांचे विशेष कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

समाजातील वंचित, निराधार आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रेम, माया आणि सेवाभावाने उभे राहणाऱ्या व्यक्तींचा गौरव म्हणजे समाजातील संवेदनशीलतेचा सन्मान होय. सौ. मीरा वाघमारे यांना प्राप्त झालेला 'समाजरत्न पुरस्कार' हा केवळ त्यांच्या वैयक्तिक कार्याचा गौरव नसून, मानवतेची सेवा करणाऱ्या प्रत्येक समाजसेवकासाठी प्रेरणादायी ठरणारा सन्मान असल्याची भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृतीदिनानिमित्त भाजपकडून अभिवादन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृतीदिनानिमित्त भारतीय जनता पार्टी छत्रपती संभाजीनगर शहरच्या वतीने विभागीय कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.



यावेळी उपस्थित मान्यवरांनी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य, समाजप्रबोधन आणि परिवर्तनवादी कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. समाजातील वंचित, उपेक्षित आणि श्रमिक घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे सांगण्यात आले. त्यांच्या विचारांमधून समता, सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक समाजव्यवस्थेचा संदेश मिळत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाबरोबरच सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी उभारलेल्या चळवळींचाही आढावा घेण्यात आला. त्यांच्या कार्याचा आदर्श समाजातील नव्या पिढीने घ्यावा आणि सामाजिक बांधिलकी जपत राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

या अभिवादन कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, भाजप शहराध्यक्ष किशोर शितोळे, शहर सरचिटणीस छाया खाजेकर, मंडळ अध्यक्ष निलेश धारकर, अनुसूचित जाती मोर्चाचे शहराध्यक्ष सचिन मिसाळ, नगरसेविका सुरेखा सानप, अमृता पालोदकर, सुनीता साळुंके, अमित देशपांडे, राहुल लोखंडे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अतुल सावे यांच्या हस्ते 'देस मेरा रंगीला' स्पर्धेच्या पोस्टरचे प्रकाशन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** युवामित्र फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आंतरशालेय व महाविद्यालयीन 'देस मेरा रंगीला' देशभक्तीपर नृत्य व गीतगायन स्पर्धेच्या पोस्टरचे प्रकाशन राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आले. १० ते १३ ऑगस्टदरम्यान होणाऱ्या या स्पर्धेची माहिती संयोजक सचिन लिला सुखदेव अंभोरे यांनी दिली.

कारगिल विजय दिन आणि स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना जागृत करण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक रामूकाका शेळके तसेच युवामित्र फाउंडेशनचे अजय भिवसने, अभिजित गवळी, अभिजित तुरेराव उपस्थित होते.



नेहरू युवा केंद्र, भारत सरकार, लाईव्ह महाराष्ट्र मराठी, बिपीन मोशन पिक्चर्स आणि आदर्श फिल्म प्रॉडक्शन यांच्या सहकार्याने हा सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येणार आहे. स्पर्धा शालेय, महाविद्यालयीन आणि खुल्या गटात होणार असून विजेत्यांना स्मृतिचिन्ह, तर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

## बांधकाम कामगारांसाठी नवीन नोंदणी आणि कार्ड नूतनीकरण प्रक्रिया सुरु!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भविष्यात शासकीय योजनांचा लाभ सुरळीत मिळावा यासाठी बांधकाम कामगारांची नवीन नोंदणी तसेच जुन्या स्मार्ट कार्डचे नूतनीकरण करण्याची प्रक्रिया अधिकृतपणे सुरू झाली आहे. ज्या कामगारांनी अद्याप आपली नोंदणी केली नसेल, त्यांनी तातडीने ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात येत आहे. ज्या बांधकाम कामगारांनी अद्याप नोंदणी केलेली नाही किंवा ज्यांचे जुने कार्ड (कालबाह्य) झाले आहे, त्यांनी त्वरित सर्व आवश्यक कागदपत्रांसह संबंधित कार्यालयाला भेट देऊन आपली प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. वेळेत नोंदणी आणि नूतनीकरण केल्यास शासकीय योजनांचा लाभ मिळणे अधिक सोपे आणि जलद होईल, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

नोंदणी केल्यास मिळणार 'हे' मोठे लाभ

**अपघात विमा सुरक्षा:** कामाच्या ठिकाणी किंवा इतरत्र अपघात झाल्यास आर्थिक संरक्षण.

**शिक्षणासाठी शिष्यवृत्ती:** कामगारांच्या पाल्यांना उच्च आणि दर्जेदार शिक्षणासाठी आर्थिक मदत.

**मातृत्व लाभ योजना:** महिला कामगारांसाठी किंवा कामगारांच्या पत्नीसाठी प्रसूती काळात विशेष साहाय्य.

**घरकुल योजना:** हक्काचे घर मिळवण्यासाठी शासनाकडून मिळणारे अनुदान.

**पेन्शन योजना:** ठरावीक वयानंतर वृद्धापकाळात नियमित पेन्शनची सोय.

**इतर विविध शासन योजना:** आरोग्य, सुरक्षा संच आणि सामाजिक सुरक्षेशी संबंधित इतर लाभ.

## रस्त्यावर कचरा फेकाल तर थेट गुन्हा; छत्रपती संभाजीनगर मनपा 'ॲक्शन मोड'मध्ये!

### एकाच दिवसात 500 हून अधिक व्यावसायिकांची तपासणी; 90 हजारांचा दंड, अनधिकृत बॅनर्सवरही होणार फौजदारी कारवाई

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहर अस्वच्छ आणि विद्रुप करणाऱ्या बेजबाबदार नागरिकांवर तसेच व्यावसायिकांवर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने आता थेट फौजदारी कारवाईचा बडगा उगारला आहे. शहरात कुठेही रस्त्यावर कचरा फेकल्यास केवळ दंडच केला जाणार नाही, तर थेट गुन्हा दाखल करण्याचा कडक इशारा मनपा प्रशासनाने दिला आहे. या मोहिमेचा भाग म्हणून घनकचरा व्यवस्थापन विभागाने एकाच दिवसात धडक कारवाई करत ५०० हून अधिक व्यावसायिकांची तपासणी केली असून, त्यांच्याकडून तब्बल ९० हजार रुपयांपेक्षा जास्त दंड वसूल केला आहे. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या निर्देशानुसार, महाराष्ट्र महानगरपालिका ऐक्टमधील कलम २९६ अन्वये हॉटेल्स, उपाहारगृहे व इतर व्यावसायिक आस्थापनांची साफसफाई विषयक तपासणी करण्यासाठी २९ दक्षता पथके तैनात करण्यात आली आहेत. ही पथके प्रत्येक आठवड्याच्या सोमवारी व गुरुवारी सायंकाळी ६.०० ते रात्री ९.०० या वेळेत प्रमुख व्यावसायिक क्षेत्रांमध्ये विशेष स्वच्छता तपासणी आणि जनजागृती मोहीम राबवणार आहेत. शहरात दिवसातून दोन वेळा घंटागाडीद्वारे कचरा संकलनाची सुविधा उपलब्ध असतानाही काही आस्थापना आणि नागरिकांकडून कचरा रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी टाकला जात असल्यामुळे हा कठोर निर्णय घेण्यात आला आहे. या पथकांद्वारे केवळ दंड केला जात नसून, ओला व सुका कचरा वेगळा करून घंटागाडीत देण्याबाबत समुपदेशनही केले जात आहे. तसेच रस्त्यावर ठेवलेले साहित्य, दगड, पेव्हर ब्लॉक, राडारोडा किंवा रात्रीच्या वेळी गुपचूप कचरा टाकणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. या मोहिमेचा दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे शहराचे विद्रुपीकरण रोखणे. आयुक्त अमोल येडगे यांनी सर्व नागरिक आणि व्यावसायिकांना १८ जुलैपर्यंत शहरातील सर्व अनधिकृत बॅनर, होर्डिंग आणि स्टँडीज स्वतःहून काढून घेण्याची मुदत दिली होती. ही मुदत संपल्यानंतर आता मनपा प्रशासन हे अनधिकृत बॅनर्स स्वतः जप्त करणार असून, संबंधितांवर शहर विद्रुपीकरणाचे गुन्हे दाखल करणार आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त नंदकिशोर भोंबे यांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ जुलै रोजी सायंकाळी करण्यात आलेल्या तपासणीत ५०० हून अधिक दुकानांची तपासणी करून ९०,००० रुपयांपेक्षा जास्त दंड वसूल करण्यात आला. मनपाच्या या धडक कारवाईमुळे शहरात एक वचक निर्माण झाला असून, व्यावसायिक आता कचरा रस्त्यावर न टाकता घंटागाडीतच देत असल्याचा सकारात्मक बदल पाहायला मिळत आहे. मनपाच्या या गतिमान कामाचे आणि शहरात होणाऱ्या सकारात्मक बदलाचे कौतुक लोकप्रतिनिधींनी केले आहे. शहराचे महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, विरोधी पक्षनेते समीर साजिद आणि सभागृह नेते गोविंद केंद्रे यांनी दक्षता पथकांच्या या कामगिरीचे अभिनंदन करत त्यांना प्रोत्साहन दिले आहे.

## बजाजनगरच्या 'बँक ऑफ बडोदा' खात्यात देशभरातील सायबर ठगांची रक्कम जमा; 10 लाख 72 हजारांचे बेकायदेशीर व्यवहार उघड करत पोलिसांनी आवळला फास

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जवळील बजाजनगर येथील बँक ऑफ बडोदा शाखेतील राहुल एंटरप्रायजेस, आसेगाव नावाच्या बँक खात्यात देशभरातील सायबर ठगांनी फसवणुकीचे पैसे पाठवल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या खात्यातून एकूण १० लाख ७२ हजार रुपयांचे बेकायदेशीर व्यवहार झाले असून, हे बँक खाते आणि त्याचा खातेदार आंतरराज्य संघटित सायबर गुन्हेगारी टोळीचा सक्रिय सदस्य असल्याचे पोलिसांनी तांत्रिक तपासाअंती निष्पन्न केले आहे.

देशभरातील ६ वेगवेगळ्या तक्रारदारांना ऑनलाइन आमिषे दाखवून तब्बल १ कोटी ८८ लाख रुपयांचा गंडा घालण्यात आला होता, ज्यातील एक मोठा हिस्सा या बजाजनगरच्या खात्यात वळवण्यात आला होता. या मोठ्या खुलाशानंतर वाळूज एमआयडीसी पोलीस आणि सायबर सेलने या टोळीचे नेटवर्क उद्‌ध्वस्त करण्यासाठी तपास तीव्र केला आहे. सध्याच्या काळात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, फसवणूक करणारे आरोपी अत्यंत हायटेक आणि संघटित पद्धतीने काम करत आहेत. हे आरोपी नागरिकांना ऑनलाइन माध्यमातून इन्व्हेस्टमेंट स्किम, पार्ट टाइम जॉब ऑफर, डिजिटल अरेस्ट तसेच इतर वेगवेगळ्या प्रकारची आमिषे दाखवून त्यांच्याकडून विविध बँक खात्यांमध्ये रक्कम ट्रान्सफर करून घेतात. गुन्हेगारांनी देशातील विविध भागांत आपले फिल्ड एजंट्स नियुक्त केले असून, या एजंटांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या आणि टार्गेट्स दिली जातात. काही एजंट दूरध्वनीद्वारे संपर्क साधून लोकांना जाळ्यात ओढतात, तर काही एजंट फसवणुकीतून मिळालेली रक्कम स्वीकारून ती पुढे इतर खात्यांमध्ये वळवण्याचे काम करतात. बजाजनगरचे हे बँक खाते याच साखळीचा एक महत्त्वाचा भाग असल्याचे तपासात उघड झाले आहे. भारत सरकारच्या नॅशनल सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टलवर देशभरातील सायबर गुन्ह्यांचे बळी पडलेल्या लोकांनी ऑनलाइन तक्रारी नोंदविल्या होत्या. या पोर्टलवरील तक्रारींची चौकशी करताना आणि बँक व्यवहारांचे तांत्रिक विश्लेषण करताना सायबर पोलिसांना बजाजनगर येथील बँक ऑफ बडोदा शाखेतील या संशयास्पद खात्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तात्काळ या खात्याचे स्टेटमेंट मागवून घेतले असता, ६ गुन्ह्यांमधील फसवणुकीची रक्कम थेट या खात्यात जमा झाल्याचे उघड झाले. यामध्ये २७ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या ४५ हजारांच्या फसवणुकीतील २५ हजार रुपये आणि ६ लाख ९३ हजार ४०० रुपयांच्या फसवणुकीतील ३० हजार रुपये या खात्यात आले होते. त्यानंतर ११ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या ९ लाख ७३ हजार ७६ रुपयांच्या फसवणुकीतील ७ हजार रुपये, तर २७ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या तब्बल १ कोटी ५२ लाख ९८ हजार ४१ रुपयांच्या मोठ्या फसवणुकीतील ५ लाख रुपये थेट या खात्यात वळवले गेले होते. याशिवाय २ नोव्हेंबर २०२५ च्या गुन्ह्यातील ५० हजार रुपये आणि ७ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या ८ लाख ७३ हजार १५६ रुपयांच्या फसवणुकीतील तब्बल ४ लाख ६० हजार रुपये याच खात्यात जमा झाले होते. या सर्व बेकायदेशीर व्यवहारांची एकूण बेरीज १० लाख ७२ हजार रुपयांच्या घरात जाते. देशभरातून फसवणूक झालेला पैसा एकाच खात्यात कसा जमा होत होता, याचा धागा पकडून आता पोलिसांनी या राहुल एंटरप्रायजेसच्या मूळ खातेदाराचा आणि त्याला मदत करणाऱ्या स्थानिक एजंट्सचा शोध सुरू केला आहे.

## हर्सूलच्या राधास्वामी कॉलनीत बंद घर फोडले; दागिने, रोख रकमेसह 49 हजारांचा ऐवज लंपास

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील हर्सूल भागातील जटवाडा रोडवरील राधास्वामी कॉलनीत एक धक्कादायक चोरीची घटना समोर आली आहे. चोरट्यांनी एका बंद घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करत सोने-चांदीच्या दागिन्यांसह नगदी १० हजार रुपये, असा एकूण ४९ हजार ८०० रुपयांचा ऐवज लंपास केला.

ही घटना गुरुवारी (१६ जुलै) सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. या प्रकरणी भागीनाथ किसन राठोड (वय ४८, रा. राधास्वामी कॉलनी, जटवाडा रोड) यांनी हर्सूल पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी भागीनाथ राठोड हे गुरुवारी आपल्या पत्नी आणि मुलासह घराला कुलूप लावून जवळच असलेल्या हरसिद्धी लॉन्सवर फिरायला गेले होते. संपूर्ण कुटुंब बाहेर गेल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद घराला लक्ष्य केले. सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास राठोड कुटुंब घरी परतले असता, त्यांना घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेले आणि दरवाजा उघडा असलेला दिसला.

घरात चोरी झाल्याचे लक्षात येताच राठोड यांनी आत जाऊन पाहणी केली. चोरट्यांनी घराची उचकापाचक करत किचनमधील लाकडी शोकेसमध्ये ठेवलेले चांदीचे कडे, मुलाचे चांदीचे दागिने, पायातील चांदीच्या चैन, जोडवे, सोन्याचा ओम आणि सोन्याची बाळी यासह १० हजार रुपयांची रोकड असा एकूण ४९ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. राठोड यांच्या तक्रारीवरून हर्सूल पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भरवस्तीत सायंकाळच्या सुमारास झालेल्या या चोरीमुळे परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस अंमलदार कोलते करत आहेत. चोरट्यांचा माग काढण्यासाठी पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेज देखील तपासत असल्याची माहिती मिळाली आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▮ संपादक : रोहित विकास पाटील ▮ email : hinduprakashvarta@gmail.com ▮ epaper.hinduprakashwarta.com ▮ PRGI No.: MHMAR/25/A2358 ▮ संपर्क क्र. : 7261999911